सोमवार, १९ सप्टेंबर २०२२
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक ६२
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या वाढदिवशी रक्तदानाचा नवा विक्रम



**नवी दिल्ली** : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींचा शनिवारी (दि. १७) ७२वा वाढदिवस होता. वाढदिवसानिमित्त देशभरात वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. आरोग्य विभागाने १७ स्प्टेंबर ते १ ऑक्टोबर या कालावधीत रक्तदान अमृत महोत्सव आयोजित केला आहे. या महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी नवा विक्रम प्रस्थापित झाला. एका दिवसात एक लाखाहून अधिक लोकांनी स्वेच्छेने रक्तदान केल्याची माहिती केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मांडविया यांनी ट्वीट करून दिली. या महोत्सवाचे उद्दिष्ट एका दिवसात एक लाख युनिट रक्त गोळा करण्याचे आहे. याशिवाय लोकांना नियमित रक्तदान करण्याबाबत प्रबोधन करण्यात येणार आहे. केंद्र, राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील सर्व मंत्रालये व विभाग, स्वयंसेवी संस्था, समुदाय संस्था आणि इतर भागधारकांनीही या मोहिमेत सहभाग घेतला आहे.

### अंतरंग

रायगडात ८८ टक्के शेतकऱ्यांचे ई-केवायसी अद्ययावतीकरण/२
दमदार पावसामुळे मोरबे धरण पूर्ण भरण्याच्या मार्गावर/६
कोविड संसर्गामुळे क्रिकेटर मोहम्मद शमी संघाबाहेर/८

# रक्तदान सर्वश्रेष्ठ दान!

### पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

## विविध ठिकाणी शिबिर; आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे यशस्वी व लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस सर्वत्र समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा होत आहे. वाढदिवसानिमित्ताने भाजपच्या वतीने विविध सेवाकार्य असलेल्या सेवा पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत पनवेल परिसरातील खांदा कॉलनी, खारघर आणि कामोठ्यात रविवारी (दि. १८) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांना भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

भाजप युवा मोर्चा पनवेलच्या वतीने खांदा कॉलनी से. १ येथील रोटरी ब्लड बँक या ठिकाणी झालेल्या रक्तदान शिबिराचे उद्घाटन भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. या शिबिरास भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, एकनाथ गायकवाड, पं. स.चे माजी सदस्य भूपेंद्र पाटील, भाजप पनवेल शहर सरचिटणीस अमरीश मोकल, रामनाथ पाटील, भीमराव पोवार, शशिकांत शेळके, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सरचिटणीस चिन्मय समेळ, तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, खांदा कॉलनी अध्यक्ष अभिषेक भोपी, महिला मोर्चा खांदा कॉलनी अध्यक्ष राखी पिंपळे, आशा मुंढे, आरती तायडे, संतोष आगलावे, अक्षय सिंग, विश्वजित पाटील आदी पदाधिकारी, कार्यकत, रक्तदाते उपस्थित होते.



खांदा कॉलनी

(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

खारघर तळोजा मंडल भाजप युवा मोर्चाच्या वतीने खारघर सेक्टर १९मधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये गरीब आणि गरजू कॅन्सरग्रस्त रुग्णांसाठी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. श्री साई ब्लड बँक पनवेलच्या सहकार्याने झालेल्या या शिबिरात अनेक युवकांनी तसेच विविध समाजाच्या व्यक्तींनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.

या शिबिराला भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर, पं. स.चे माजी सदस्य भूपेंद्र पाटील, माजी नगरसेवक हरेश केणी, अभिमन्यू पाटील, रामजी बेरा, शत्रुघ्न काकडे, निलेश बाविस्कर, अ‍ॅड. नरेश ठाकूर, प्रवीण पाटील, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, अनिता पाटील, खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, सरचिटणीस दीपक शिंदे, उपाध्यक्ष दिलीप जाधव, बीना गोगरी, रमेश खडकर, वासुदेव पाटील, अमर उपाध्याय, अल्पसंख्याक सेल प्रदेश सचिव मन्सूर पटेल, युवा मोर्चा खारघर अध्यक्ष विनोद घरत, गीता चौधरी, शुभ पाटील, अक्षय पाटील अंबालाल पटेल, सचिन वासकर, प्रभाकर जोशी, अ‍ॅड. इर्शाद पटेल, गिरीश गुप्ता, शैलेंद्र त्रिपाठी, नवनीत मारू, फुलाजी ठाकूर, किरण पाटील, म्हात्रे, कुणाल संघानी, नंदकुमार मोरे, प्रमोद पाटील, पप्पू खामकर, सुमीत सहाय, जयश्री सूर्यवंशी, सुशीला शर्मा, निर्मला यादव, दिनेश रणशेवडे, सुजित पांडे आदी उपस्थित होते.

कामोठ्यातील स्वामी समर्थ सेवा केंद्र येथे निर्धार सामाजिक संस्था व झेंडा सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट दिली. या वेळी भाजप कामोठे शहराध्यक्ष रवींद्र जोशी, जय पावणेकर, अशोक पावणेकर, निलेश आहेर, विशाल बेलकर, अजित पवार, किरण भोसले आदी उपस्थित होते.

**उरण : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त उरण तालुका भाजपतर्फे द्रोणागिरी नोड येथील श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयात रविवारी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात आमदार महेश बालदी यांनी रक्तदान केले.**

(वृत्त पान ३ वर..)



उरण

## निती आयोगाच्या धर्तीवर राज्यात संस्था उभारणार

### शिंदे-फडणवीस सरकारचा निर्णय



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात विविध क्षेत्रांमध्ये परिवर्तनासाठी निती आयोगाच्या धर्तीवर राज्यस्तरीय संस्था स्थापन होत असून त्या माध्यमातून कृषी, आरोग्य, शिक्षण, रोजगार, पर्यावरण या विषयावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि. १८) येथे दिली.

सह्याद्री अतिथीगृहात निती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी परमेश्वरन अय्यर यांच्या आयोगातील तज्ज्ञांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांची भेट घेतली. त्या वेळी झालेल्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांच्यासह राज्य प्रशासनातील विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

केंद्र शासनाच्या योजनांची यशस्वी अंमलबजावणी करण्यावर आमचा भर असून राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलीयन डॉलर होण्यासाठी महाराष्ट्र मेहनत करण्यात कमी पडणार नाही, असे मुख्यमंत्री या वेळी म्हणाले.

**नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई दिली जाणार**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना राज्याच्या विविध भागांत पावसामुळे झालेल्या शेतीच्या नुकसानीच्या भरपाईसंदर्भात भाष्य केले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संततधार पावसामुळे ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्याची घोषणा केली आहे. लवकरच या सर्व भागांमध्ये नुकसानीचे पंचनामे केले जातील. त्यानंतर भरपाईसंदर्भात राज्य सरकारकडून आदेश काढले जातील, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### निवडक

**पंजाबमध्ये विद्यार्थिनींचे खासगी व्हिडीओ लीक**

**मोहाली** : पंजाबच्या मोहालीमध्ये चंडीगड विद्यापीठातील एका महाविद्यालयीन विद्यार्थिनीने इतर विद्यार्थिनींचे अंघोळ करतानाचे व्हिडीओ रेकॉर्ड करून ते शिमल्यातील तरुणाकरवी इंटरनेटवर व्हायरल केले. त्यामुळे खळबळ उडाली आहे. संतप्त विद्यार्थिनींनी महाविद्यालयाच्या गेटवर जमून निदर्शने करीत कारवाईची मागणी केली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी विद्यार्थिनी व तरुणाला अटक केली असून अधिक तपास सुरू आहे.

**तैवानमध्ये भूकंपाचे हादरे; मोठ्या प्रमाणात नुकसान**

**तैपेई** : तैवानमध्ये २४ तासांमध्ये दुसऱ्यांदा ७.२ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला असून सार्वजनिक व खासगी मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. युजिंग प्रांताला त्याचा फटका बसला आहे. याआधी शनिवारीही येथे भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले होते. या भूकंपानंतर त्सुनामी अलर्ट जारी करण्यात आलाय.

## जहाल नक्षलवाद्याला नालासोपाऱ्यातून अटक; महाराष्ट्र एटीएसची मोठी कारवाई

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) मोठी कारवाई करीत मुंबई उपनगरातील नालासोपाऱ्यातून एका जहाल नक्षलवाद्याला अटक केली आहे. कारू हुलाश यादव (४५) असे या नक्षलवाद्याचे नाव असून तो मूळचा झारखंडच्या हजारीबागमधील डोडगा येथील रहिवासी आहे. या नक्षलवाद्यावर १५ लाखांचे बक्षीस होते.



कारू यादव हा जहाल नक्षलवादी झारखंडमधून मुंबईत उपचारासाठी आला होता तसेच नालासोपारा परिसरात लपून राहत होता. याची माहिती महाराष्ट्र एटीएसला मिळाल्यानंतर या पथकाने रविवारी सकाळी नालासोपाऱ्यात छापा टाकून त्याला ताब्यात घेतले. तो कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (माओ) या केंद्र सरकारने प्रतिबंधित केलेल्या संघटनेशी संबंधित असून त्याच्यावर ३१ गुन्हे दाखल आहेत.

दरम्यान, ही धडाकेबाज कारवाई करणाऱ्या महाराष्ट्र एटीएसचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कौतुक केले आहे. याबद्दल प्रसारमाध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, एक अतिशय चांगली कारवाई महाराष्ट्र एटीएसने केली आहे. ज्याच्यावर १५ लाख रुपयांचे इनाम होते अशा नक्षलवाद्याला नालासोपारा येथून पकडण्यात आले आहे. त्याला झारखंड सरकारच्या ताब्यात देण्यात येणार आहे. यामुळे नक्षलवादी चळवळीला मोठा धक्का बसणार आहे. या कारवाईबद्दल मी एटीएसचे अभिनंदन करतो. या कारवाईमुळे नक्षलवाद्यांच्या नेटवर्कचा खुलासा होणार आहे.

## माणगावमधून अपहरण केलेल्या अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग

**माणगाव : प्रतिनिधी**



**आरोपी फरार**

माणगाव तालुक्यातील भादाव गावातून फूस लावून अपहरण केलेली अल्पवयीन मुलगी सापडली असून तिच्यावर नराधमाने अतिप्रसंग केल्याची बाब समोर आली आहे. पीडितेने दिलेल्या माहितीनुसार पोलिसांकडून आरोपीचा शोध सुरू आहे.

माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार भादावमधील नऊ वर्षीय मुलीला तिच्या अजाणतेपणाचा फायदा घेत आरोपीने पळवून नेले होते. या प्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. पोलीस या मुलीचा शोध घेत असताना अखेर ती सापडली. दक्षता कमिटीच्या महिलांनी तिची विचारपूस केली असता या अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग झाल्याची बाब समोर आली आहे, तर पोलीस पथक आरोपीचा शोध घेत असल्याची माहिती निरीक्षक राजेंद्र पाटील यांनी दिली.

## सातारा मॅरेथॉनमध्ये धावताना कोल्हापूरच्या युवकाचा मृत्यू



**वाई : प्रतिनिधी**

साताऱ्यात रविवारी (दि. १८) आयोजित हाफ हिल मॅरेथॉनमध्ये धावताना एका तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. राज क्रांतीलाल पटेल (वय ३२, रा. कोल्हापूर) असे मृत पावलेल्या तरुणाचे नाव आहे.

साताऱ्यात रविवारी पहाटे मोठ्या उत्साहात २१.१ किमी अंतराची यवतेश्वर कास घाटातील हाफ मॅरेथॉनला सुरवात झाली. या स्पर्धेत कोल्हापूरचा राज पटेल हाही सहभागी झाला होता. धावत असताना पटेल अचानक कोसळला. त्याला तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र तोवर त्याचा मृत्यू झाला होता. शवविच्छेदनानंतर त्याच्या मृत्यूचे नेमके कारण कळेल, असे डॉक्टरांनी म्हटले आहे.

दरवर्षी याच काळात आयोजित करण्यात येणारी ही हिल मॅरेथॉन प्रसिद्ध आहे. यासाठी देशभरातून तसेच परदेशातूनही हौशी धावपटू येत असतात. दरवर्षी शिस्तबद्ध पद्धतीने ही मॅरेथॉन होते, मात्र यंदा एका धावपटूचा मृत्यू झाल्याने सहभागी धावपटूंकडून हळहळ व्यक्त होत आहे.

## पनवेलमध्ये पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा




**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र रायगड-अलिबाग आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्था पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने नोकरी इच्छुक उमेदवारांसाठी पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा मंगळवारी (दि. २०) सकाळी १०.३० ते दुपारी २ या वेळेत औद्योगिक प्रशिक्षण संस्था या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील नामांकित आस्थापनांकडील ४६७पेक्षा जास्त रिक्त पदांच्या भरतीसाठी हा रोजगार मेळावा आहे. या रोजगार मेळाव्यात एसएससी पास, आयटीआय, डिप्लोमा इंजिनियर, पदवी इंजिनियर, फार्मासिस्ट इत्यादी नोकरी इच्छुक उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे निवड केली जाणार आहे.

रोजगार मेळाव्यातील रिक्तपदांची माहिती www.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवर उपलब्ध असून अधिक माहितीकरिता या कार्यालयाच्या दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०२९वर संपर्क साधावा तसेच या विनामूल्य रोजगार मेळाव्यास नोकरी इच्छुक उमेदवारांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त अ. मु. पवार यांनी केले आहे.

## 'नाणार रिफायनरी कोकणातच होणार'

**मुंबई : प्रतिनिधी**

नाणार रिफायनरी कोकणातच होणार, असे केंद्रीय उद्योगमंत्री नारायण राणे यांनी म्हटले आहे. वेदांता-फॉक्सकॉन प्रकल्प गुजरातला गेल्यानंतर नाणार रिफायनरी प्रकल्पही दुसऱ्या राज्यात जाऊ शकतो का या प्रश्नावर मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलताना ना. राणेंनी हे उत्तर दिले. ठरलेल्या ठिकाणीच नाणार रिफायनरी होणार असून या प्रकल्पाला कोणाचाही विरोध चालू देणार नाही, असेही ते म्हणाले.

नाणार येथील तेलशुद्धीकरण प्रकल्प गेली सात वर्षे चर्चेत आहे. या प्रकल्पाला ग्रामस्थांचा विरोध आहे. नाणार येथील प्रस्तावित प्रकल्प पर्यावरण आणि पुनर्वसनाच्या मुद्द्यामुळे बारगळल्यानंतर हा प्रकल्प राजापूर तालुक्यातच बारसू गाव परिसरात उभारण्याचाही प्रस्ताव आहे. दरम्यान, या प्रकल्पासंदर्भात संबंधित कंपनीसोबत चर्चा सुरू असल्याची माहिती ना. राणे यांनी दिली.

(सविस्तर वृत्त पान २ वर..)

## पुण्यात 'मविआ'त बिघाडी; मनपा निवडणुकीसाठी काँग्रेसचे 'एकला चलो रे'

**पुणे : प्रतिनिधी**

आगामी पुणे महापालिका निवडणूक काँग्रेस पक्ष स्वबळावर लढणार आहे. पुणे शहर जिल्हा काँग्रेस कोअर कमिटीच्या रविवारी (दि. १८) झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे महाविकास आघाडीत बिघाडी होणार आहे.

महापालिका निवडणुकासाठी सर्व पक्षांकडून मोर्चेबांधणी करण्यात येत आहे. या अनुषंगाने पुणे शहर जिल्हा काँग्रेस कोअर कमिटीची बैठक रविवारी काँग्रेस भवनात झाली. या बैठकीत पक्षाने महापालिका निवडणूक स्वबळावर लढवावी, अशी मागणी उपस्थित नेते आणि कार्यकर्त्यांनी केली.

कार्यकर्त्यांच्या तसेच सर्व नेतेमंडळींच्या आग्रही मागणीमुळे आगामी पुणे महापालिकेची निवडणूक काँग्रेस स्वबळावर लढणार असल्याची घोषणा पक्षाचे पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष अरविंद शिंदे यांनी केली आहे. काँग्रेसच्या निर्णयानंतर शिवसेना आणि राष्ट्रवादीची भूमिका काय असणार याकडे आता लक्ष लागले आहे.

(छाया : सुधीर नाझरे)



मुरुड : डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे श्रीसदस्यांनी कोर्लई ते सावलीदरम्यान रस्ता स्वच्छता मोहीम राबविली. (वृत्त पान ५ वर..)

# नाणार रिफायनरी कोकणातच होणार

## कंपनीसोबत चर्चा सुरू; केंद्रीय मंत्री नारायण राणे यांची माहिती



**‘चांगल्या गोष्टींचे तरी कौतुक करा’**

**पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या वाढदिवशी शनिवारी भारतात नामिबियावरून चित्ते आणण्यात आले. मध्य प्रदेशच्या कुनो नॅशनल पार्कमध्ये या चित्त्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सोडले. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी यावरून मोदी सरकारचा चित्ता सरकार असा उल्लेख केला. ठाकरेंच्या या टोमण्याला केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. उद्धव ठाकरे यांच्याकडे चांगली वाक्य नसतील, तर त्यांनी मला फोन करावा. त्यांना चांगले बोलताच येत नाही, माझ्याकडे आहेत. चांगल्या गोष्टींचे कौतुक करावे, अशी टीका नारायण राणेंनी केली आहे.**

**मुंबई : प्रतिनिधी**

कोकणात नाणार रिफायनरी होणारच, असे केंद्रीय उद्योगमंत्री नारायण राणे यांनी म्हटले आहे. वेदांता प्रकल्प गुजरातला गेल्यानंतर नाणार रिफायनरी प्रकल्पही दुसऱ्या राज्यात जाऊ शकतो का? या प्रश्नावर नारायण राणेंनी हे उत्तर दिले आहे. ठरलेल्या ठिकाणीच नाणार रिफायनरी होणार असून या प्रकल्पाला कोणाचाही विरोध चालू देणार नाही, असेही मुंबईत बोलताना नारायण राणे म्हणाले आहेत. या संदर्भात काही केंद्रीय नेत्यांच्या संपर्कात असून संबंधित कंपनीसोबत चर्चा सुरू असल्याची माहिती राणे यांनी दिली आहे.

नाणार येथील तेलशुद्धीकरण प्रकल्प गेली सात वर्षे चर्चेत आहे. या प्रकल्पाला ग्रामस्थांचा तीव्र विरोध आहे. नाणार येथील प्रस्तावित तेलशुद्धीकरण प्रकल्प पर्यावरण आणि पुनर्वसनाच्या मुद्द्यामुळे बारगळल्यानंतर हा प्रकल्प राजापूर तालुक्यातच बारसू गाव परिसरात १३ हजार एकरवर उभारण्याचा प्रस्ताव आहे.

रत्नागिरी रिफायनरी अ‍ॅण्ड पेट्रोकेमिकल्स लिमिटेड (आरआरपीसीएल) हा ६० दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेचा प्रकल्प रत्नागिरीतील नाणार येथे होणार होता. इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लि., हिंदूस्थान पेट्रोलियम, भारत पेट्रोलियम या भारतीय कंपन्या आणि सौदी अरामको, अबुधाबी नॅशनल ऑइल कंपनी यांनी त्यासाठी सामंजस्य करार केला होता, पण नाणार येथील भूसंपादनातील पर्यावरण व पुनर्वसनाच्या समस्येमुळे हा प्रकल्प बारगळला.

आता प्रकल्पासाठी राजापूर तालुक्यातीलच बारसू परिसराचा पर्याय पुढे आला आहे. हा प्रकल्प झाल्यावर महाराष्ट्राच्या सकल राज्य उत्पन्नात ८.५ टक्के भर पडेल आणि देशाच्या अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे. त्याचप्रमाणे स्थानिकांना रोजगारही मिळणार आहे. त्यामुळे या प्रकल्पाला कोणाचाही विरोध चालू देणार नाही, असेही या वेळी त्यांनी सांगितले आहे.

# पनवेलमध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागातर्फे कारवाई

## डिसेंबर २०२१ ते ऑगस्ट २०२२पर्यंत १६२ गुन्ह्यांची नोंद

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर राज्य उत्पादन शुल्क यांनी डिसेंबर २०२१ ते ऑगस्ट २०२२पर्यंत अवैध मद्य वाहतूक, बेकायदेशीर मद्य विक्री करणाऱ्यांवर १६२ गुन्ह्यांची नोंद केली आहे. या प्रकरणी २२ लाख ७७ हजार १२३ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यामध्ये अवैध दारू वाहतूक करणारे एकूण १२ वाहने जप्त करण्यात आली आहेत, तसेच अनुज्ञप्तीवर विभागीय विसंगतीचे एकूण २८ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे.

पनवेल परिसराची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. नागरिकरणदेखील झपाट्याने वाढू लागले आहे. पार्टी, समारंभ, मेजवानी, लग्न समारंभामध्ये मोठ्या प्रमाणात मद्य पुरविले जाते. या वेळी मद्यपान करणाऱ्यांचे प्रमाणदेखील भरमसाठ आहे. अशा वेळेला बनावट मद्याचादेखील पुरवठा केला जातो. परराज्यातून मोठ्या प्रमाणावर बेकायदा मद्य शहरात आणले जाते. याविरोधात उत्पादन शुल्क विभागाने कठोर कारवाईचा बडगा उगारला असून बेकायदेशीर मद्य व रसायन विकणाऱ्या विक्रेत्यांवरदेखील कारवाई केली आहे.

उघड्यावर मद्य पिणाऱ्या मद्यपींवर व ढाबा मालकावर गुन्हे नोंद करीत त्यांना शिक्षादेखील न्यायालयाने दिली आहे. बियर शॉपसमोर उघडपणे बियर पिणाऱ्या मद्यपी तसेच बिअर शॉपमालकावर गुन्हे नोंद करीत एकूण सात बियर शॉपी या जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने बंद करण्यात आलेल्या आहेत. अपुरे संख्याबळ असूनही उपलब्ध कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने राज्य उत्पादन शुल्क पनवेल विभागाची कारवाईची मोहीम सुरू आहे. नागरिकांना अवैध धंद्याबाबत तक्रारी असल्यास राज्य उत्पादन शुल्क विभाग, निरीक्षक पनवेल शहर यांच्या कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# शिवडी-न्हावा सी लिंकबाधितांना भरपाई द्यावी

## मच्छीमार बांधवांनी घेतली ना. मुनगंटीवार यांची भेट

**नवी मुंबई : बातमीदार**

शिवडी न्हावा-शेवा मुंबई ट्रान्सहार्बर क्रीक सी लिंक प्रकल्पामध्ये नवी मुंबईतील बाधित मच्छीमार बांधवांना त्वरीत नुकसान भरपाई मिळावी म्हणून शिवसेना (मुख्यमंत्री एकनाथ शिंदे समर्थक) उपनेते पर्यावरण समाधान प्राधिकरण महाराष्ट्र राज्य अध्यक्ष विजय नाहटा यांनी मत्स्यव्यवसाय व बंदर विकासमंत्री सुधीर मुनगंटीवार यांची प्रकल्पग्रस्तांसह भेट घेऊन मच्छीमार बांधवांना तत्काळ नुकसान भरपाई मिळावी म्हणून निवेदनातून मागणी केली.



मरीआई मच्छीमार सहकारी संस्थेच्या वतीने शिवसेना उपनेते विजय नाहटा यांना दहा गावाच्या प्रकल्पग्रस्त मच्छीमार बांधवांच्या वतीने नुकसान भरपाई मिळावी म्हणून निवेदन देण्यात आले होते. अरबी समुद्रात होऊ घातलेल्या शिवडी न्हावा-शेवा मुंबई ट्रान्सहार्बर क्रीक सी लिंक प्रकल्पामध्ये बाधित झालेल्या मच्छीमार बांधवांना एमएमआरडीएकडून नुकसान भरपाई मिळावी म्हणून मागणी करण्यात आली होती. त्या निवेदनाचा विचार करून उपनेते विजय नाहटा यांनी मत्स्यव्यवसाय व बंदरे विकासमंत्री सुधीर मुनगंटीवार यांची मंत्रालय येथे जाऊन भेट घेतली. उपनेते नाहटा यांनी, मंत्री मुनगंटीवार यांना, नकाशा दाखवत कोणता भाग प्रकल्पांतर्गत येणार आहे, या प्रकल्पामुळे मासे या भागात येण्याची शक्यता कमी आहे, मच्छीमारांना मासेमारी करणे मुशिकल होणार आहे. उदरनिर्वाहाचे साधन मासेमारी असलेल्या अनेक कोळी बांधवांवर आर्थिक संकट ओढवण्याची शक्यता आहे, या सर्व बाबी लक्षात आणून दिल्या.

मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी एमएमआरडीए प्रादेशिक उपायुक्तांना आदेश देऊन मच्छीमार बांधवांना नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले जातील असे आश्वासन दिले. या वेळी मरीआई मच्छीमार सहकारी संस्थेचे अध्यक्ष हरिश्चंद्र सुतार, दिलीप पाटील, मुकेश, अनंता मढवी, विश्वनाथ तांडेल, रुपेश भोईर आदी उपस्थित होते.

# उरणमध्ये जोरदार पावसाचा भातशेतीला फटका

**उरण : रामप्रहर वृत्त**

आठवडाभरापासून तालुक्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे भातशेती पाण्याखाली गेली असून पिके कुजण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.



गेल्या आठवड्याभरापासून तालुक्यात मुसळधार पाऊस कोसळत आहे. तालुक्यातील ठिकठिकाणच्या शेतातील भातपिक असा पाऊस कोसळत राहिला तर आडवे होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकरी पाऊस थांबण्याची वाट पाहत आहेत. जून महिन्यात बरेच दिवस पाऊस गायब झाला होता. त्यानंतर जुलै महिन्यामध्ये पावसाने पुन्हा हजेरी लावली. तद्नंतर येथील शेतकऱ्यांनी भातपिकांच्या लागवडीला सुरुवात केली, परंतु काही ठिकाणी भातरोपेही तयार नसल्यामुळे भाताची लावणी करण्यासाठी ऑगस्ट महिना उजाडला.

पावसाच्या अनियमितपणामुळे यंदा शेतकरी अडचणीत सापडला आहे, परंतु याही स्थितीत भाताचे पीक शेतात बहरू लागल्यानंतर मात्र पुन्हा एकदा सरत्या पावसाने शेतात उभ्या असलेल्या पिकांना धोका निर्माण केला आहे. पावसाबरोबर वारादेखील असल्याने भाताचे पीक शेतात कोसळून पडेल याची भीतीदेखील शेतकऱ्यांना वाटत आहे. यंदा भाताचे पीक भरपूर होईल ही येथील छोट्या शेतकऱ्यांची आशा या कोसळणाऱ्या पावसामुळे ती मावळू लागली आहे.

# रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलतर्फे कळी उमलताना कार्यक्रम उत्साहात

**पनवेल : वार्ताहर**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलतर्फे सायबर गुन्हे रोखण्यासाठी ८ वी ते १२ वीच्या मुले आणि मुलींसाठी सायबर सिक्युरिटी अवेरनेस याबद्दल पनवेल शहर पोलीस निखिल महाडेश्वर आणि संतोष शेटे यांनी मार्गदर्शन केले. या वेळी ४८० विद्यार्थी उपस्थित होते.

याच उपक्रमात दुसऱ्या भागात कळी उमलताना नावाचा वयात येणाऱ्या मुलींसाठी डाएट प्लॅन आणि मासिक पाळीच्या वेळी मुलींनी घ्यायची काळजी यावर डॉ. संजीवनी गुणे यांनी माहिती दिली. या वेळी ३३० मुलींची लक्षणीय उपस्थिती होती. गुणे यांनी उपस्थित मुलींना महत्त्वपूर्ण माहिती दिली. या कार्यक्रमाला शाळा समितीचे अध्यक्ष काशिनाथ पाटील, मुख्याध्यापक कुंभार, सर्व शिक्षक, रोटरी क्लबचे अध्यक्ष लक्ष्मण पाटील, सचिव अनिल ठकेकर व रोटरीयन्स उपस्थित होते. सर्वांचे आभार प्रोजेक्ट चेअरमन डॉ. लक्ष्मण आवटे यांनी मानले.



# रायगडात ८८.६१ टक्के शेतकऱ्यांचे ई-केवायसी अद्ययावतीकरण

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यामध्ये एक लाख ७४ हजार २१६ प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेतील लाभार्थी असून एक लाख ३४ हजार २८९ शेतकऱ्यांनी आधारकार्ड जोडलेले आहे. जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशानुसार नुकत्याच जिल्हा प्रशासनाने हाती घेतलेल्या ई-केवायसी अद्ययावतीकरणानुसार आत्तापर्यंत एक लाख १६ हजार ५४० (८८.६१ टक्के) शेतकऱ्यांनी ई-केवायसी अपडेट केले आहे.

ज्या शेतकऱ्यांनी किसान क्रेडिट कार्ड, ज्यामध्ये पीक लागवडीसाठी, पशुधन संगोपनासाठी, मच्छी पालनासाठी, बँकेकडून खेळते भांडवल मंजूर करण्यात येते, त्या शेतकऱ्यांनी आपले खाते ज्या बँकेत आहे त्या बँकेत संबंधित कागदपत्रे जमा करून किसान क्रेडिट कार्ड योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी केली आहे.

यासाठी संबंधित कृषी विभाग, महसूल विभाग, ग्रामपंचायत, बँका यांना आपापल्या क्षेत्रांमध्ये एकमेकांच्या सहयोगाने मेळावा घेऊन किसान सन्मान योजनेतील पात्र लाभार्थ्यांना किसान क्रेडिट कार्डचा लाभ मिळवून देण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेतील पात्र लाभार्थ्यांनी आपले अर्ज ग्रामपंचायत, कृषी विभाग, बँका यामध्ये जमा करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी केले आहे.

# फ्रँचायझीच्या बहाण्याने १० लाखांचा ऑनलाइन गंडा

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यात ज्येष्ठ नागरिकाला अमूल डेअरीची डिस्ट्रीब्यूशन फ्रॅन्चायझी देण्याच्या बहण्याने १० लाख ४२ हजार रुपयांना लुटल्याचा प्रकार घडला आहे. या प्रकरणी या ज्येष्ठ नागरिकाने बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. हा सर्व प्रकार गेल्या महिन्याभरापासून सुरू होता.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींकडून फिर्यादींना फोन करून अमूल डेअरी डिस्ट्रीब्यूशन फ्रॅन्चायझी देण्याचा बतावणी केली. गुजरातमधील आनंद येथे अमूलचे मुख्य कार्यालय असल्याने तेथील इंडियन बँकेच्या खात्यात पैसे भरायला सांगितल्याने फिर्यादींना विश्वास बसला. आपल्याला फ्रँचायझी मिळेल या आशेने त्यांनी एका महिन्यात तब्बल १० लाखांपेक्षा अधिक रक्कम जमा केली, मात्र अजून काही रक्कम लागणार असल्याची मागणी समोरून होत होती. काम होत नव्हते हे लक्षात येताच आपली फसवणूक झाली आहे हे कळल्यानंतर फिर्यादीने पोलिसांकडे धाव घेतली.



**मुंबई : पत्रकार विकास संस्थेतर्फे हज हाऊसमध्ये झालेल्या कार्यक्रमात पनवेल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ईकबाल काझी यांना प्रतिष्ठेचा उर्दू मित्र पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.**

# पनवेल ठाण नाका येथे जनरेटरची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

होन्डा कंपनीच्या लाल रंगाच्या जनरेटरची चोरी झाल्याची घटना शहरातील जुना ठाणा नाका परिसरात घडली आहे. याबाबत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

धीरूभाई अंबानी यांच्या जुना ठाणा नाका परिसरातील धीरूभाई इंटरप्रायझेस शॉप नंबर १९ सेलकम सोसायटी, जुना ठाणा नाका येथे ठेवलेला ७५ हजार रुपये किमतीचा लाल रंगाचा जेनरेटर अज्ञाताने चोरून नेल्याने याबातची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# ...तर सगळे वाद मिटतात | मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंना सल्ला

**मुंबई : प्रतिनिधी**

सत्तासंघर्ष झाल्यानंतर शिंदे गट आणि शिवसेना यांच्यातील वाद टोकाला गेले आहेत. दरम्यान, एका कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरेंवर निशाणा साधत मैत्रीसोबत क्षमा जोडली, तर सगळे वाद मिटतात, असे म्हटले आहे. भारतीय जैन महामंडळाचा विश्वमैत्री दिवस कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.




या कार्यक्रमादरम्यान, बोलताना मुख्यमंत्री शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला. फक्त घरात बसून काहीच होत नाही असा खोचक टोमणा देत क्षमा करण्यासाठी मोठे मन हवे, मैत्रीसोबत क्षमा जोडली तर सगळे वाद मिटतात, असे शिंदे या वेळी म्हणाले. कष्ट करा, काहीही करा पण नशिबाची साथ नसेल तर काहीच होत नाही, पण कष्ट करण्याचे काम आपले आहे. ते तर करावेच लागेल. नाहीतर नशिबात सगळे आहे, मात्र कष्ट नाही केले तर काहीच होणार नाही, नुसते घरी बसून काहीच होत नाही, असा खोचक टोमणा त्यांनी या वेळी अप्रत्यक्षपणे उद्धव ठाकरेंना मारला.


कुणाला तरी माफ करणे ही साधी गोष्ट नाही, त्यासाठी मोठे मन लागते. साधत मैत्रीसोबत क्षमा जोडली तर सगळे वाद मिटतात, असा टोलाही शिंदेंनी उद्धव ठाकरेंना लगावला आहे.

दसरा मेळाव्यावरून ठाकरे आणि शिंदे गटात चढाओढ सुरू असताना उद्धव ठाकरेंना मोठा धक्का बसला आहे. कारण बीकेसीच्या एमएमआरडीएच्या मैदानावर मेळावा घेण्यास शिंदे गटाचा अर्ज स्वीकारण्यात आला आहे.

**दुखवटा**

## दिलीप गायकवाड

**कर्जत** : कर्जत तालुक्यातील आसल येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते दिलीप गायकवाड यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ६५ वर्षे होते. माजी आमदार सुरेश लाड यांचे ते निकटचे सहकारी होते. त्यांना स्थानिक सामाजिक क्षेत्रात आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अप्पा नावाने ओळखले जात होते. त्यांचा सामाजिक आणि विधायक कार्यात मोठा सहभाग होता. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, सूना, भाऊ, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. गायक रायगड भूषण अजय गायकवाड यांचे ते वडील होते. त्यांच्या निधनानंतर परिसरातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी हळहळ व्यक्त केली.




पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
सोमवार, दि. १९ सप्टेंबर २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)
कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स
सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)
- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.

### आमदार महेश बालदींच्या मार्गदर्शनाखाली विकासकामांना वेग

# केळवण्यात रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन

## जि. प. सदस्य ज्ञानेश्वर घरत यांच्या हस्ते शुभारंभ

**उरण : वार्ताहर**

आमदार महेश बालदी व रायगड जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत यांच्या प्रयत्नाने केळवणे पंचक्रोशी रस्ता तयार करण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत यांच्या हस्ते झाले.

गेल्या रविवारी (दि. ११) आमदार महेश बालदी व ज्ञानेश्वर घरत यांच्या प्रयत्नांने केळवणे शाळा वर्गखोली आणि मरीआई मंदिर शेड तयार करणे या दोन कामांचे भूमिपूजन झाले होते. यासोबतच आता केळवणे पंचक्रोशीतील रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. त्यामुळे या विभागात विकास कार्याला गती मिळाली, असा विश्वास लोकांच्या मनात जागृत होत आहे.





उद्घाटनावेळी ग्रामपंचायत सदस्य सुशील ठाकूर, हरिश्चन्द्र पाटील, आत्माराम माळी, जगन्नाथ म्हात्रे, पांडुरंग पाटील, रमेश ठाकूर, महादेव म्हात्रे, संजय पाटील, रामचंद्र मोकळ, भारत ठाकूर, हरिश्चन्द्र माळी, निलेश शेडगे, धर्मेंद भोईर, परमवीर शेडगे, प्रकाश ठाकूर, तेजस माळी, कृष्णा म्हात्रे, समीर ठाकूर, जितू गावंड, राजन घरत, संजय पाटील, योगेश घरत, राजेश घरत, विलास ठाकूर, ज्ञानेश्वर पाटील, वैभव म्हात्रे, जितू गावंड, हरेश म्हात्रे, तसेच ग्रामस्थ व गावातील असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# खांदेश्वर शिव मंदिर आणि तलाव परिसर झाला चकाचक

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत स्वच्छता अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुशंगाने खांदेश्वर शिव मंदिर व तलाव परिसर या ठिकाणी उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या वेळी माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, भाजप खांदा कॉलनी उपाध्यक्ष सचिन मोरे, सरचिटणीस भीमराव पोवार, चिटणीस मोतीलाल कोळी, कामगार नेते रामनाथ पाटील, ओबीसी शहर अध्यक्ष प्रवीण भोसले, ज्येष्ठ नेते काका शेळके, सदस्य युवराज बेडसे, खांदा कॉलनी महिला अध्यक्षा राखी पिंपळे, सरचिटणीस आशा मुंढे, उपाध्यक्ष मनीषा पाटील, सानिका इंदुलकर, सोनाली सावंत, विद्या यादव, अनिता रासकर, शुभांगी रायते, सुनीता गुरव आदी उपस्थित होते.



## पनवेल, उरण महाविकास आघाडीत गळती सुरूच

### समाजवादी पक्ष बाहेर

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल-उरण विधानसभा क्षेत्रात महाविकास आघाडीमध्ये आपापसातील मतभेद वाढत चालले असून समाजवादी पक्षाने मात्र उघडपणे नाराजी व्यक्त केली आहे. समाजवादी पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष अनिल नाईक यांनी महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत त्यांनी पनवेल-उरण महाविकास आघाडीचे अध्यक्ष बबन पाटील व सचिव सुदाम पाटील यांना लेखी पत्रही दिले आहे.

पनवेल-उरण तालुक्यातील काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना, शेकाप आणि समाजवादी पक्ष यांनी एकत्रित महाविकास आघाडी स्थापन केली होती. स्थानिक पातळीवर स्थापन झालेल्या या महाविकास आघाडीतून आता समाजवादी पक्ष बाहेर पडला आहे.

समाजवादी पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष अनिल नाईक यांनी याबाबत पत्रक काढून माहिती दिली. स्थानिक पातळीवरील विविध निवडणुकादेखील समाजवादी पक्ष स्वतंत्रपणे लढणार असल्याचे या वेळी नाईक यांनी सांगितले. त्यामुळे महाविकास आघाडीत फूट पडताना दिसून येत आहे.

## उरणमध्ये रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद; १२६ दात्यांचे योगदान

**उरण : वार्ताहर**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त उरण तालुका भाजपतर्फे द्रोणागिरी नोड येथील श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर विद्यालयात रविवारी (दि. १८) आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. १२६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या रक्तदान शिबिरांचे औचित्य साधून उरणचे आमदार महेश बालदी यांनी स्वतः रक्तदान करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

उरण तालुका भाजपा व नवी मुंबई खारघर रुग्णालय रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात उरणचे आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हा निरिक्षक नंदू पटवर्धन, भाजपचे तालुकाध्यक्ष रवी भोईर, उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह, तालुका उपाध्यक्ष सुनील पाटील, भाजपचे जिल्हा सरचिटणीस चंद्रकांत घरत, कामगार संघटना जिल्हाध्यक्ष जितेंद्र घरत, महिला मोर्चा तालूकाध्यक्षा राणी म्हात्रे, तालुका सरचिटणीस निर्मला घरत, महालण विभाग अध्यक्ष महेश कडू, जि. प. सदस्य विजय भोईर, नगराध्यक्ष सायली म्हात्रे, नगरसेविका स्नेहल कासारे, जानव्ही पंडित, समिधा ठाकूर, वर्षा ठाकूर, जिल्हा उपाध्यक्ष जितेंद्र पाटील, उरण शहर महिला उपाध्यक्ष तथा माजी नगरसेविका नंदा माझगावकर, ओबीसी जिल्हाध्यक्ष निळकंठ घरत, तालुका युवा अध्यक्ष, शेखर पाटील, समीर मढवी, तालूका सरचिटणीस प्रकाश ठाकूर, मिलिंद ठाकूर, दिनेश तांडेल, उपसरपंच शरद ठाकूर, बाळूशेठ घरत, अजय पाटील, संतोष मढवी नगरसेवक, नंदू लांबे, तालुका सरचिटणीस दिपक भोईर, विशाल म्हात्रे, उरण तालुका उपाध्यक्ष मुकूंद गावंड, शशिकांत पाटील, उद्योजक राजा पडते, निलेश भोईर, जसीम गॅस, सामाजिक कार्यकर्ते गोरख ठाकूर, माजी सरपंच योगेश पाटील आदी भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी रक्तदान शिबिरात सहभाग घेऊन अनोळख्या पद्धतीने देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.




या शिबिरात सहभाग घेणाऱ्या रक्त दात्यांना उरणचे आमदार महेश बालदी वस्तू स्वरुपात भेट देऊन त्यांचा तसेच खारघर येथील रुग्णालयातील डॉक्टरांचा सन्मान केला आहे.

## भाजप खारघर तळोजा महिला मोर्चाने राबविले अंगणवाडी दत्तक अभियान

**खारघर : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली खारघर सेक्टर १३ येथे अंगणवाडी १/२, खारघर तळोजा महिला मोर्चा यांनी अंगणवाडी दत्तक अभियान हा कार्यक्रम राबविले. यामध्ये खारघर तळोजा महिला मोर्चाने उत्स्फूर्त सहभाग घेतला व मुलांना पोषक आहार देत स्वच्छता अभियानही राबविले तसेच वृक्षारोपणही केले.



या वेळी भाजप मंडल उपाध्यक्ष बिना गोगरी, महिला चिटणीस मधुमिता जेना, महिला सरचिटणीस साधना अशोक पवार, प्रभाग ६ अध्यक्ष नीलम विसपुते, सदस्य श्यामला सुरेश, सेक्टर ११ सदस्य अश्विनी भुवड, शोभा मिश्रा, कांचन बिर्ला, स्नेहल बोधाई सोशल मीडिया संयोजिका उपस्थित होत्या.

मुलांना पोषक आहार म्हणून शामला सुरेश यांनी उकडलेली अंडी, मधुमिता जेना यांनी बिस्किट, कांचन बिर्ला स्नेहल बोधाई यांनी रबडी व महिला मोर्चा तर्फे इडली असा पोषक आहार मुलांना देण्यात आला. त्याचबरोबर मुलांना मिळत असलेले धान्य कुठल्या क्वालिटीचे आहे हे चेक करण्यात आले. अंगणवाडीच्या असलेल्या अडचणी जाणून घेण्यात आल्या आणि त्या अडचणी लवकरात लवकर दूर करू, अशी ग्वाही अंगणवाडीच्या परिचारिकांना देण्यात आली. यासाठी अंगणवाडीच्या परिचारिका आशा पाटील व सुरेखा पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले.

## पनवेलमध्ये एकाला ऑनलाइन गंडा

**पनवेल :** ऑनलाइन रक्कम वळतीकरून एका व्यक्तीची ५६ हजार रुपयाची ऑनलाइन फसवणूक झाल्याची घटना शहरात घडली आहे. विनोद नेमण (वय ६४) यांनी औषधे परदेशात पाठविण्याकरीता गुगल ॲपवरून फेडेक्स कुरिअर पनवेल यावर फोन केला. तेव्हा समोरील अज्ञात व्यक्तीने फेडेक्स कुरियरचे रिन्यूवेशन काम सुरू असून कुरियर करण्याकरिता त्याच्या मोबाइलवर एक लिंक पाठवली.

यावर ऑनलाइन रिसिप्ट ॲप डाऊनलोड करण्यास फोन पे किंवा गुगल पे वरून पाच रुपये पाठविण्यास सांगितले.तसे त्यांनी पाठविले असता त्या नुसार समोरील अज्ञात व्यक्तीने त्याच्या संमतीशिवाय त्याच्या मोबाईलचा ऑनलाइन ताबा घेऊन न कळत त्यांच्या बँकेच्या खात्यातून ५६ हजार रुपये रक्कम वळती केली. याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## चिंचवण येथून मायलेक बेपत्ता

**पनवेल :** आई व मुलगा राहत्या घरातून कोठेतरी निघून गेल्याने बेपत्ता झाल्याची घटना तालुक्यातील चिंचवण गावाच्या हद्दीत घडली आहे. येथे राहणाऱ्या जयश्री जाधव (वय २२), उंची पाच फूट, रंग निमगोरा, नाक सरळ, चेहरा गोल, बांधा मध्यम, केस काळे व लांब असून अंगात हिरव्या रंगाची साडी व ब्लाऊज, कानात खोट्या रिंगा तर तिचा एक वर्षाचा मुलगा देवांश, उंची दीड फूट, रंग निमगोरा, नाक बसके, चेहरा गोल, बांधा मध्यम, केस काळे बारीक असून अंगात पोपटी रंगाचा हाफ शर्ट व निळ्या रंगाची हाफ जीन्स पँट घातली आहे. हे दोघे चिंचवण येथून पोयंजे येथे रिक्षाने जाण्याकरीता गेले असता ते पळस्पे फाटा येथे उतरल्यानंतर कोठे तरी निघून गेले आहेत. या दोघांबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे फोन (०२२- २७४५३२३३) किंवा पोलीस हवालदार एच. जी. आहिरे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.





### अर्थसाक्षर स्पर्धा : ३६
**निकाल पुढीलप्रमाणे**

१. शेअर बाजारात गुंतवणूक करण्यासाठी आवश्यक असलेल्या डीमॅट खात्यांची संख्या भारतात सध्या एवढी झाली आहे?
**इ. १० कोटी**

२. मोबाईल सेवा पुरविणारी भारतातील सर्वांत मोठी कंपनी कोणती आहे?
**अ. जिओ**

३. भारतीय शेअर बाजारात सर्वाधिक बाजारमूल्य असलेली बँक कोणती?
अ. एचडीएफसी बँक

**राम प्रहर**

### अर्थसाक्षर स्पर्धा : ३७

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. शेअर बाजाराच्या निफ्टी इंडेक्समध्ये किती कंपन्यांचा समावेश आहे?**
**अ.** १० **आ.** ३० **इ.** ५० **ई.** १००

**२. भारतात सध्या एलआसीसह एकूण किती जीवन विमा कंपन्या आहेत?**
**अ.** २४ **आ.** २० **इ.** १० **ई.** २६

**३. क्रिप्टो करन्सी तयार करताना कोणत्या तंत्रज्ञानाचा वापर केला जातो?**
**अ.** ब्लॉकचेन **आ.** मेटा **इ.** गुगल **ई.** फाईव्ह जी

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.



**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## सीकेटी कॉलेजमध्ये 'नॅनो टेक्नॉलॉजी आणि त्याची उपयुक्तता' चर्चासत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज न्यू पनवेल (स्वायत्त) येथे १६ आणि १७ सप्टेंबर २०२२ रोजी राष्ट्रीय उच्चतर शिक्षण अभियानांतर्गत रसायनशास्त्र विभागातर्फे नॅनो टेक्नॉलॉजी आणि त्याची उपयुक्तता या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात सहभागी विद्यार्थी व प्राध्यापकांना विविध मान्यवरांकडून मार्गदर्शन करण्यात आले. या राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्‌घाटन सोहळ्यावेळी रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख आणि औद्योगिक आणि अभियांत्रिकी रसायनशास्त्राचे प्राध्यापक, रासायनिक तंत्रज्ञान संस्था मुंबईचे प्रोफेसर भालचंद्र भनगे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



या चर्चासत्रामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. एस. के. पाटील यांनी महाविद्यालयाच्या आजपर्यंतच्या प्रगतीचा आढावा घेतला. तसेच रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख व ह्या चर्चासत्राचे संयोजक प्रोफेसर डॉ. बी. व्ही. जाधव यांनी रसायनशास्त्र विभागाची व चर्चासत्राची विस्तृत माहिती सादर केली. प्रमुख पाहुणे मा. प्रोफेसर भालचंद्र भनगे यांनी नॅनो टेक्नॉलॉजी आणि त्याची उपयुक्तता या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. विविध रासायनिक प्रक्रियांमध्ये नॅनो टेक्नॉलॉजीचा उपयोग कसा होतो याची माहिती उपस्थितांना करून दिली.

या चर्चासत्राच्या पहिल्या दिवशी प्रथम सत्रात मुंबई विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागाचे प्रोफेसर डॉ. विश्वनाथ पाटील, द्वितीय सत्रात रासायनिक तंत्रज्ञान संस्था, मुंबई येथील प्रोफेसर अतुल चासकर यांनी मार्गदर्शन केले आणि तृतीय सत्रात मौखिक सादरीकरण घेण्यात आले. त्यासाठी परीक्षक म्हणून रासायनिक तंत्रज्ञान संस्था, मुंबईचे प्रोफेसर दीपक पिंजारी व प्रोफेसर अतुल चासकर उपस्थित होते.

या चर्चासत्राच्या दुसऱ्या दिवशी प्रथम सत्रात शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, रसायनशास्त्र विभागाचे प्रोफेसर डॉ. अनिल घुले, द्वितीय सत्रात मुंबई विद्यापीठाच्या नॅनो टेक्नॉलॉजी विभागाचे प्रोफेसर डॉ. प्रवीण वाळके आणि तृतीय सत्रात भाभा ऑटोमिक रिसर्च सेंटर , मुंबईच्या रसायनशास्त्र विभागाच्या वैज्ञानिक अधिकारी डॉ. जयश्री रामकुमार यांनी मार्गदर्शन केले. यानंतर पोस्टर सादरीकरण घेण्यात आले. त्यासाठी परीक्षक म्हणून महर्षी दयानंद महाविद्यालय परेल येथील डॉ. अनिरुद्ध पाटील उपस्थित होते.

राष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोप सोहळ्याप्रसंगी भाऊसाहेब नेने महाविद्यालय, पेणचे सन्माननीय प्राचार्य डॉ. एस. बी. धारप प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सूत्रसंचालन रसायनशास्त्र विभागाच्या डॉ. सपना चिलाटे तसेच आभार सहसंयोजक व रुसा समन्वयक डॉ. शैलेश वाजेकर यांनी मानले. हे चर्चासत्र महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आले होते. प्राचार्य प्रोफेसर डॉ. एस. के. पाटील यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख व ह्या चर्चासत्राचे संयोजक प्रोफेसर डॉ. बी. व्ही. जाधव आणि सहसंयोजक व रुसा समन्वयक डॉ. शैलेश वाजेकर व रसायनशास्त्र विभागाच्या सर्व प्राध्यापकांनी हे चर्चासत्र यशस्वीरित्या पार पडण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

कार्यक्रम यशस्वी केल्याने संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी विशेष कौतुक केले.

## संपादकीय

# पावसाचे धूमशान

यंदा पावसाळ्याच्या पहिल्याच महिन्यात ओढ देणाऱ्या मान्सूनने त्यानंतरच्या पुढील दोन महिन्यांत दमदार वृष्टी केली. चालू महिन्यातही जोरदार पाऊस पडत असून अनेक ठिकाणी ढगफुटीसदृश पावसामुळे पूरस्थिती निर्माण होऊन जनजीवनावर परिणाम झालेला आहे. सप्टेंबरच्या पंधरवड्यानंतरही वरुणराजाने धो धो बरसत दाणादाण उडविल्याने शेतकऱ्यांसह सर्वांनाच फटका बसत आहे.

**भारतीय उपखंडात जून ते सप्टेंबर या चार महिन्यांच्या कालावधीत मान्सून अर्थात पावसाळा असतो. शेती, शेतीपूरक व्यवसायांसह मानव आणि संपूर्ण सजीवसृष्टीवर याचा फार मोठा प्रभाव असतो, कारण पावसाळ्यात पडणाऱ्या पावसावर उर्वरित सहा महिन्यांचेही पाण्याचे नियोजन अवलंबून असते, पण अलिकडच्या काळात विविध घटकांमुळे ऋतूचक्र बदलले आहे. परिणामी मान्सूनही अनियमित झाल्याचे दिसून येते. पूर्वी जून महिन्याच्या सुरुवातीला वरुणराजा वर्दी द्यायचा. त्यानंतर जुलैमध्ये तो सर्वाधिक बरसत असे. मग ऑगस्टमध्ये त्याचा जोर कमी होऊन सप्टेंबरमध्ये त्याच्या परतीचा प्रवास सुरू व्हायचा. हल्ली मात्र वर्षभर कुठे ना कुठे कधी ना कधी अवकाळी पाऊस पडतो. एवढेच नव्हे; तर मुख्य कालावधीतही त्याची वाटचाल अनियमित असते. यंदा मान्सूनचे आगमन लवकर होणार असे भाकित हवामान खात्याने वर्तविले होते. प्रत्यक्षात मात्र मान्सून उशिरा दाखल झाला. त्यानंतर जवळपास महिनाभर तो असून नसल्यासारखा राहिला. मग मात्र पुढील दोन महिने मुसळधार पाऊस पडला. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात पावसाचा जोर कमी होता, पण त्यानंतर पुन्हा तो बरसू लागलाय. या पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी शिरून नुकसान झाले. पडझडीच्या घटना घडल्या. रस्ते, रेल्वे वाहतुकीत अडथळा आला. शेतकऱ्यांना त्याचा सर्वाधिक फटका बसलाय. खरीप हंगामातील पीक अतिवृष्टीमुळे धोक्यात आले आहे. आधीच मजुरांची वानवा, साधनसामग्रीच्या वाढत्या दरांमुळे शेतकरीवर्ग मेटाकुटीला आला आहे. त्यातच निसर्गाची अवकृपा बळीराजाच्या चिंतेमध्ये भर घालताना दिसत आहे. याबरोबरच मानवी चुकाही आपत्तींना निमंत्रण देत आहेत. निसर्गाची छेडछाड, डोंगर उत्खनन, अनधिकृत बांधकामे, भराव, नदी-नाल्यांचे प्रवाह बदलणे या बाबीही संकटे वाढविण्यास कारणीभूत ठरत आहेत. सुदैवाने राज्यात सत्तांतर होऊन शेतकरी हिताला प्राधान्य देणारे, जनतेची काळजी घेणारे नवे सरकार सत्तेत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दोघेही लोकांमध्ये वावरणारे, त्यांच्या अडी-अडचणी समजून घेणारे आणि समस्या सोडविणारे नेते आहेत. सरकार स्थापन झाल्यानंतर लगेचच या दोघांनी अतिवृष्टीग्रस्त भागांना भेटी देऊन पाहणी करून नुकसानभरपाईचे आदेश दिले होते. पूर्वी नुसत्या घोषणा होत असत. मदत काही मिळत नसे, परंतु आता घोषणेची पूर्तता होऊन बाधितांना वेळीच मदत मिळते. त्यामुळे त्यांना सावरण्यास, पुन्हा उभारी घेण्यास बळ मिळते. गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख सरकार राज्यात आले आहे. खरंतर कुणावरही संकट येऊ नये, पण वरुणराजा असाच बरसत राहिल्यास ओला दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होण्यास वेळ लागणार नाही. त्यामुळे आता सारे जण 'जारे जारे पावसा' अशी विनवणी वरुणराजाला करू लागले आहेत.**

# आदिवासी समाज उत्कर्षाची आदर्श ग्रामयोजना

**खबरबात**
**संतोष पेरणे**

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाच्या वतीने प्रधानमंत्री आदिवासी आदर्श ग्रामयोजना जाहीर केली आहे. त्यात आदिवासी विकास विभागाच्या पेण प्रकल्प यांच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यातील २१ गावे-वाड्यांमध्ये ही योजना राबविली जाणार आहे. कर्जत तालुक्यातील १४ ग्रामपंचायतींमधील २१ गावे-वाड्यांमध्ये ही योजना राबविण्यासाठी उच्च शासकीय अधिकारी यांच्या माध्यमातून आणि देखरेखीखाली ही योजना राबविली आहे.



आदिवासी समाजाची लक्षणीय लोकसंख्या असलेल्या गावांमध्ये शासनाच्या विविध योजनांद्वारे मूलभूत आणि पायाभूत सुविधा सेवा देण्यासाठी आदर्श गावांमध्ये रुपांतर करण्यासाठी त्या त्या आदिवासी गावातील एकात्मिक सामाजिक आणि आर्थिक विकास साधणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. ५० टक्के अनुसूचित जमातीचे लोकसंख्या असलेल्या कर्जत तालुक्यातील १४ ग्रामपंचायतींमधील २१ गावे - वाड्यांचा समावेश आदर्श गाव योजनेत समावेश आहे. कर्जत तालुक्यातील शेलू ग्रामपंचायतीमधील बेडीसगाव, ओलमन ग्रामपंचायतीमधील ओलमन आणि झुगरेवाडी, नांदगाव ग्रामपंचायतीमधील बलीवरे आणि नांदगाव तर खांडस ग्रामपंचायतीमधील चाफेवाडी, वारे ग्रामपंचायतीमधील कुरुंग, पोशीर ग्रामपंचायतीमधील देवपाडा, अंभेरपाडा ग्रामपंचायतीमधील अंभेरपाडा तसेच पाथरज ग्रामपंचायतीमधील ताडवाडी, शिलार, किकवी आणि पाथरज यांचा तर बोरिवली ग्रामपंचायतीमधील सुगवे, मोग्रज ग्रामपंचायतीमधील पिंगळस, धामणी, मोग्रज यांच्यासह कशेळे ग्रामपन्चायत मधील कशेळे, भालिवडी ग्रामपंचायतीमधील वंजारवाडी, पळसदरी ग्रामपंचायतीमधील पळसदरी आणि बीड बुद्रुक ग्रामपंचायतीमधील चोची यांचा समावेश आहे. या गावांमध्ये राबविल्या जाणाऱ्या आदर्श ग्रामयोजनेमध्ये ग्रामविकास आराखडा तयार करताना रस्ते विकास, दूरसंचार सुविधा, अंगणवाडी केंद्रे, आरोग्य उपकेंद्रे, पिण्याच्या पाण्याची सुविधा, गटारे व मल व्यवस्थापन, तसेच कौशल्य वृद्धी कार्यक्रम, समुदाय वनविकास, वनधन कार्यक्रम, जलस्त्रोतांचे संरक्षण यावर काम केले जाणार आहे. त्यासाठी ग्रामपंचायतींकडून प्राप्त झालेल्या ग्रामविकास आराखड्यांना मंजुरी आवश्यक आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी गाव विकास आराखडा दस्तऐवजीकरण करणे तसेच योजनेंतर्गत मंजुर कामांच्या अंमलबजावणीचा दरमहा आढावा घेतला जाणार आहे. योजना राबविण्यासाठी शासनाचे आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी, ग्रामीण विकास यंत्रणेचे सहसंचालक, मुख्य उपवन अधिकारी, जिल्हा अधिकारी यांचे प्रतिनिधी, जलसंपदा कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा कार्यकारी अभियंता, अग्रणी बँक प्रतिनिधी, सहकार प्रकल्प अधिकारी, भारत संचार निगम, या सर्व विभागांचे अधिकारी समितीमध्ये असून त्यांच्याकडून आदर्श गावांचा विकास आरखडा तयार केला जाणार आहे.

या योजनेचा केंद्र, राज्य शासनाच्या इतर योजनांसोबत निधी योजना, वित्त आयोग, सामुहिक वन हक्कांतर्गत करावयाचे नियोजन, ठक्कर बाप्पा योजना, जिल्हा नियोजनांतर्गत प्राप्त होणारा निधी, जिल्हा खनिज निधी किंवा इतर योजना, एकात्मिकरण करण्यासाठी प्रकल्प स्तरीय समिती नियोजन करावे लागणार आहे. ग्रामविकास आराखड्यात कामांची माहिती व ते कोणत्या निधीतून घेण्यात येणार आहेत याबाबतची स्पष्टता असावी, तसेच कामांची पुनरावृत्ती होणार नाही याचीदेखील दक्षता घेतली जाणार आहे.

केंद्र शासनाने आदर्श गाव संकल्पनेवर आधारित अनुसूचित जमातीच्या लोकसंख्या असलेल्या गावांचा एकात्मिक, आर्थिक व सामाजिक विकास करण्यासाठी प्रधानमंत्री आदि आदर्श ग्राम विकास ही योजना प्रस्तावित केलेली असून सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचना आदिवासी विकास विभागाचे शासन निर्णय अन्वये राबविली जाणार आहे. या योजनेद्वारे आदिवासी समाजाची लक्षणीय लोकसंख्या असलेल्या गावांमध्ये अभिसरणाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजनांद्वारे मूलभूत व पायाभुत सुविधा सेवा पुरवुन त्यांचे आदर्श गावांमध्ये रुपांतर करणे, निवडलेल्या गावांचा अभिसरणाच्या माध्यमातून एकात्मिक सामाजिक व आर्थिक विकास साधणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे.

योजनेच्या अंमलबजावणीसाठी ज्या गावात अनुसूचित जमातीची लोकसंख्या किमान ५० टक्के आणि किमान ५०० अनुसूचित जमातीचे नागरिक आहेत अशी गवे निवडण्यात आली आहेत.



### योजनेसाठी तांत्रिक सहाय्य

***विविध प्रकल्प कार्यालये, माडा क्लस्टर, मिनी माडा क्लस्टर, ग्रामपंचायती यांच्याशी समन्वय साधण्यासाठी व तांत्रिक सहाय्य पुरविण्यासाठी राज्य स्तरावर कार्यक्रम व्यवस्थापन कक्ष तयार करणे. योजनेंतर्गत जमा होणाऱ्या माहितीचे व्यवस्थापन करण्यासाठी एमआयएस प्रणाली स्थापन करणे आणि योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रशासकीय खर्च म्हणून दोन टक्के निधी वापरएयात येईल, तर प्रशिक्षण आणि क्षमता बांधणी यासाठी आदर्श ग्रामयोजनेंतर्गत ग्रामविकास आराखडा बनविण्यासाठी व योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आवश्यकतेनुसार प्रशिक्षण व क्षमता बांधणी करताना योजनेच्या जनजागृती आणि प्रसिद्धीमध्ये माहिती, शिक्षण आणि संप्रेषण यांचे महत्त्व लक्षात घेतले जाणार आहे.***

## बदलते तंत्रज्ञान

# ई-सिम कार्डचे फायदे आणि तोटे

ई-सिमबाबत भारतातील एक चांगली गोष्ट म्हणजे जीओ, एअरटेल आणि वोडाफोन- आयडीयाने ई-सिम सेवा देणे सुरू केले आहे. आज आपण ई-सिमकार्ड म्हणजे काय? त्याचे फायदे आणि तोटेही याची सविस्तर माहिती जाणून घेणार आहोत.




गेल्या काही दिवसांपासून ई-सिमवर बरीच चर्चा सुरू आहे. त्यात ॲपल आयफोन १४मध्ये फिजिकल सिमऐवजी कंपनीने फक्त ई-सिमचा पर्याय दिला आहे, पण ई-सिम असलेले मॉडेल सध्या फक्त यूएसमध्ये विकले जाणार आहेत.

मुळात ई-सिम ही संकल्पना नवीन नाही. आतापर्यंत अनेक फोनमध्ये हे फीचर आले आहे, परंतु सध्या ही सेवा फक्त त्या फोनमध्ये उपलब्ध आहे, ज्यात किमान एक फिजिकल सिम आहे. ई-सिम काय आहे आणि ते नक्की कसे काम करते? या प्रश्नांची उत्तरे जाणून घेऊया.

ई-सिम हे एक व्हर्चुअल सिम आहे. या सिमला आपण डोळ्यांनी पाहू नाही शकत, कारण ते हार्डवेअर किंवा मदरबोर्डवर बसवलेले असते. हे सिम काढता येत नाही. हे एका विशेष आयडी अंतर्गत दूरसंचार नेटवर्कशी कनेक्ट होण्यास मदत करते. फोनवर फक्त सिमच्या मदतीने मेसेज आणि कॉल्स येतात.

जे लोक सतत सिमकार्ड बदलत नाहीत त्यांच्यासाठी ई-सिम हे खूप फायदेशीर ठरते. या ई-सिममध्ये अनेक प्रोफाईल सेव्ह केले जाऊ शकतात, तसेच आपण एका शहरातून दुसऱ्या शहरात गेलो तर ते आपोआप शहरानुसार प्रोफाइल बदलू शकते. ई-सिम तुमच्या स्मार्टफोनची सुरक्षा अधिक मजबूत करते. तुम्ही जर का तुमच्या स्मार्टफोनमध्ये ई-सिमचा वापर केला असेल आणि जर तो फोन हरवला तर त्याचा डेटा लॉक उघडल्याशिवाय सहज काढता येत नाही. त्यामुळे हरवलेला स्मार्टफोन सहजपणे ट्रॅक करू शकतो.

**आता बघूया ई-सिमचे नुकसान काय आहे?**

समजा एखाद्या वेळेला जर तुमचा स्मार्टफोन अचानक बंद पडला, तर तुम्हाला त्या मोबाईलमधले ई- सिम काढून इतर कोणत्याही स्मार्टफोनमध्ये टाकता येणार नाही.

आपल्या साध्या सिमकार्ड एक फायदा असा की , फोन खराब झाल्यास, तुम्ही ते सिम काढून सहजपणे दुसऱ्या फोनमध्ये टाकू शकता.

# अंतराळवीर सुनीता विल्यम्सची कहाणी...

भारतीय वंशाची अमेरिकन नौसेनेतील अधिकारी व नासा अंतराळयात्री सुनीता विल्यम्स यांचा १९ सप्टेंबर १९६५ साली जन्म झाला. आज त्यांच्या जन्मदिनी त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा...



सुनीताचा जन्म युक्लिड, ओहिओ येथे झाला. त्यांचे वडील भारतीय-अमेरिकन न्यूरोअँटोमिस्ट दीपक पंड्या तर आई स्लोव्हिन-अमेरिकन उर्सुलिन बोनी पंड्या. सुनीता नीडहॅम, मॅसाच्युसेट्स येथील नीडहॅम हायस्कूलमधून पदवीधर झाल्या. त्यांना १९८७ साली युनायटेड स्टेट्स नेव्हल अकादमीकडून भौतिक विज्ञान या विषयात बॅचलर ऑफ सायन्सची पदवी मिळाली आणि १९९५मध्ये फ्लोरिडा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथून अभियांत्रिकी प्रबंधन या विषयात मास्टर ऑफ सायन्सची पदवी मिळाली.

मे १९८७ला त्या अमेरिकन नौदलामध्ये रुजू झाल्या. नेव्हल कोस्टल सिस्टिम कमांडमध्ये सहा महिन्यांच्या तात्पुरत्या नियुक्तीनंतर त्यांची बेसिक डायव्हिंग ऑफिसर म्हणून नियुक्ती करण्यात आली. पुढे त्यांची जुलै १९८९मध्ये नेव्हल एव्हिएटर म्हणून नियुक्ती झाली आणि त्यांनी सप्टेंबर १९९२मध्ये अँड्र्यू चक्रीवादळाच्या वेळी मायामी, फ्लोरिडा येथे झालेल्या बचावकार्यात महत्त्वाची कामगिरी बजावली. जून १९९८मध्ये त्या सैपान येथे नियुक्त असतांना त्यांची अवकाश मोहिमेकरिता नासामध्ये निवड झाली.

लहानपणापासूनच काहीतरी वेगळे करण्याचे सुनीताचे स्वप्न होते. जमीन आकाश आणि समुद्र या तीनही ठिकाणी तीला जायचे होते. बहुदा म्हणूनच मे १९८७ला अमेरिकी नेवल अकॅडमीच्या माध्यमातून त्या नौसेनेशी जुळल्या आणि त्यानंतर हेलिकॉप्टर पायलट झाली.

सहा महिन्यांच्या नेवल तटवर्ती कमांडमधील अस्थायी नियुक्तीनंतर सुनीताला 'बेसिक डायविंग ऑफिसर' या पदावर निवडण्यात आले. पुढे त्यांना नेवल एयर ट्रेनिंग कमांड म्हणून ठेवले व जुलै १९८९मध्ये त्यांना नेवल एवियेटरचे पद देण्यात आले. त्यानंतर सुनीता यांची नियुक्ती 'हॅलिकॉप्टर कॉम्बैट सपोर्ट स्क्काड्रन' म्हणून करण्यात आली. त्यांनी आपल्या प्रारंभिक ट्रेनिंगची सुरूवात हॅलिकॉप्टर कॉम्बैट सपोर्ट स्क्काड्रन तीन (एचसी तीन)मध्ये एच-४६ सागर नाइटमधून केली होती. त्यानंतर सुनिता विल्यम्स्वर नॉरफोक, वर्जीनियात हेलिकॉप्टर कंबाट सपोर्ट स्क्काड्रन आठ (एचसी आठ)ची जबाबदारी सोपविली. या दरम्यान सुनीता विलियम्स यांना अनेक ठिकाणच्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या.

भूमध्य सागर, रेड सी आणि पार्शियन गल्फमध्ये त्यांनी 'ऑपरेशन डेजर्ट शील्ड' आणि 'ऑपरेशन प्रोवाइड कम्फर्ट' दरम्यान कार्य केले. सप्टेंबर १९९२ला त्यांना एच-४६ तुकडीचा ऑफिसर इनचार्ज बनवून मिआमिला पाठविण्यात आले. या तुकडीला हरिकेन अँड्र्यूशी संबंधित कामाकरीता पाठविण्यात आले होते.

१९९८साली सुनीता यांची निवड नासाकरीता झाली, त्यावेळी त्या यूएसएस सैपानवरच कार्यरत होत्या. त्यांची एस्ट्रोनॉट कॅंडिडेट ट्रेनिंग जॉनसन स्पेस सेंटरमध्ये ऑगस्ट १९९८ला सुरू करण्यात आली. ६ एप्रिल २००७ला त्यांनी अंतराळातच 'बोस्टन मॅराथन'मध्ये सहभाग घेतला आणि त्याला सुनिता यांनी फक्त चार तास २४ मिनिटांमध्येच पूर्ण केले. या स्पर्धेमुळे सुनीता विलियम्स अंतराळात मॅराथनमध्ये धावणारी पहिली व्यक्ती ठरली आणि २२ जून २००७ला ती पृथ्वीवर परतली. सुनिता १७ सप्टेंबर २०१२ला एक्सपीडिशन ३३च्या कमांडर बनन्या. हे यश मिळविणारी ती दुसरी महिला आहे.

**-साभार माझी मराठी, विकीपिडीया**

## क्लिक...क्लिक...!



**मुरूड : सध्या कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे कोळी बांधवांचा दुसरा हंगामही फुकट गेला. वादळी पावसामुळे एकदरा समुद्रकिनाऱ्यावर अनेक बोटी शाकारून ठेवण्यात आल्या असून मच्छीमारांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

# पायाच्या त्वचेचा रंग सांगेल शरीरातील कोलेस्टेरॉल पातळी



कोलेस्टेरॉल हा चरबीचा एक प्रकार आहे, जो रक्तवाहिन्यांमध्ये प्लाक जमा करतो. यामुळे, रक्तवाहिन्या अरुंद होतात, ज्यामुळे हृदयातून रक्तप्रवाहात अडथळा येतो. उच्च कोलेस्टेरॉल ही अशी स्थिती आहे, ज्यामध्ये रक्तामध्ये खूप जास्त कोलेस्ट्रॉल सर्क्युलेट होते. यामुळे हृदयविकाराचा झटका किंवा स्ट्रोक सारख्या हृदयविकाराची समस्यासुद्धा उद्भवू शकते. शरीरातील उच्च कोलेस्टेरॉल शोधणे थोडे कठीण आहे. जेव्हा शरीरात बॅड कोलेस्टेरॉलची पातळी वाढते, तेव्हा त्याचे पहिले लक्षण पायांवर दिसू लागते. पायातील कोणती लक्षणे कोलेस्ट्रॉल वाढण्याचे संकेत देतात ते जाणून घेऊया...

- आरोग्य अहवालानुसार, जर तुमच्या पायाची त्वचा पिवळी पडू लागली असेल, डोळ्याभोवती ठिपके दिसू लागले असतील किंवा तळव्यांची त्वचा हलकी निळी दिसत असेल, तर तुम्ही सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. हे शरीरातील खराब कोलेस्टेरॉल वाढण्याचे लक्षण असू शकते. माहितीनुसार, उच्च कोलेस्ट्रॉलमुळे शरीरातील रक्त प्रवाह कमी होतो, ज्यामुळे त्वचेचा रंग बदलू लागतो.
- जर तुमच्या पायावर केसांची वाढ अचानक थांबली असेल तर ते उच्च कोलेस्ट्रॉलचे लक्षणदेखील असू शकते. यासोबतच जर तुमच्या तळव्यांना काही जखम झाली असेल आणि ती सहज बरी होत नसेल तर हे जास्त कोलेस्टेरॉलमुळे लक्षण असू शकते.
- उच्च कोलेस्टेरॉलची लक्षणे जाणून घेण्यासाठी, रात्री झोपताना अचानक तुमच्या पायात वेदना होत असतील तर ते टाळण्यासाठी उपाय पहा. या दरम्यान, टाचांमध्ये क्रॅम्पिंग होते, बोटांमध्ये वेदना होतात. असे रोजच होत असेल तर काळजी घेण्याची गरज आहे.
- चालताना आणि व्यायाम करताना नेहमी पाय दुखत असतील तर त्यासाठी सावध राहा. हे उच्च कोलेस्टेरॉलचे लक्षण असू शकते. जेव्हा रक्ताभिसरण कमी होते आणि पुरेसे रक्त पायांपर्यंत पोहचत नाही तेव्हा असे होते. अशा परिस्थितीत, अनेकदा पाय जडपणा आणि थकवा जाणवते.

# माथेरान पालिका सात ई-रिक्षा खरेदी करणार

## सनियंत्रण समितीच्या बैठकीत निर्णय



**कर्जत : बातमीदार**

माथेरानलर ई-रिक्षा चालविण्यासाठी सर्वोच्य न्यायालयाचे आदेश आहेत. माथेरानमध्ये चार कंपन्यांच्या ई-रिक्षा माथेरानमध्ये आल्या होत्या आणि त्या वाहनांमधून विभागीय परिवहन अधिकारी यांनी चाचणी घेतली होती. दरम्यान, ई रिक्षेची चाचणी माथेरानमध्ये यशस्वी झाल्यानंतर तीन महिने सर्व भागात जाऊन चाचणी घेण्यासाठी सात रिक्षा खरेदी करण्यास माथेरान नगरपरिषदेला परवानगी देण्यात आली आहे. सनियंत्रण समितीच्या बैठकीत ही परवानगी देण्यात आली असून लवकरच माथेरानमध्ये ई-रिक्षा चालताना दिसणार आहे.

वाहनांना बंदी असलेल्या माथेरानमध्ये विद्यार्थ्यांना आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी ई-रिक्षा सुरु कराव्यात अशी मागणी माथेरानमधील श्रमिक हातरिक्षा संघटनेकडून १२वर्षांपासून मोहीम उघडली होती. माथेरान मध्ये माणसे ओढणारी रिक्षा ब्रिटिश काळापासून पर्यटकांना त्या रिक्षेत बसवून त्या हातरिक्षा ओढून नेण्याची कामे केली जात होती. ही अमानवी प्रथा बंद व्हावी, यासाठी श्रमिक रिक्षा संघटनेकडून वेगवगेळ्या मार्गाने पर्यावरण पूरक वाहनांची परवानगी मागितली जात होती. मात्र माथेरानमधील जाचक अटी आणि नियम लक्षात घेऊन आपल्याला शासन परवानगी देणार नाही याची जाणीव झाल्यानंतर शेवटी श्रमिक हातरिक्षा संघटनेने न्यायालयाचा दरवाजा ठोठावला होता. तब्बल १२ वर्षाच्या म्हणजे एक तपाच्या प्रतिक्षेनंतर सर्वोच्य न्यायालयाने १० मे रोजी ऐतिहासिक निर्णय देताना माथेरानमध्ये पर्यावरण पूरक रिक्षा चालविण्यास परवानगी दिली होती. त्यासाठी राज्य सरकारने रिक्षा खरेदी करून तीन महिने चाचणी घ्यावी आणि त्याचा अहवाल राज्य सरकारला सादर झाल्यानंतर राज्य सरकारकडून सर्वोच्य न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करेल असे आदेश देण्यात आले होते.

सर्वोच्य न्यायालयाच्या आदेशानंतर राज्य सरकारने २७ जुलै रोजी माथेरान मध्ये विविध पाच कंपन्यांना त्यांच्या ई रिक्षा आणून त्याची चाचणी घेतली. त्या दिवशी पोलीस बंदोबस्तात माथेरान मध्ये चार ई-रिक्षा यांनी प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या उपस्थितीत चाचणी घेतली. त्याचा अहवाल माथेरान नगरपरिषदेकडून मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी रायणगड जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केला. हा अहवाल जिल्हा प्रशासन यांच्याकडून राज्य सरकारकडे सादर झाल्यानंतर पुढील दिशा नक्की झाली आहे. माथेरान या थंड हवेच्या ठिकाणाबाबत आणि येथील पर्यावरण मंत्रालयाचे निर्देश लक्षात घेऊन नियत्रंणाचे काम पाहणाऱ्या सनियंत्रण समितीची बैठक मुंबई येथे नुकतीच झाली. या बैठकीत २७ जुलै रोजी घेण्यात आलेल्या चाचणीचा अहवाल लक्षात घेऊन माथेरानमध्ये सर्व भागातील रस्त्यावरून ई-रिक्षा चालविली जावी आणि त्यानंतर वाहतुकीस सुरु करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी तीन महिने शासन स्तरावर ई-रिक्षा चालविण्यासाठी आदेश देण्यात आले आहेत. सनियंत्रण समितीच्या आदेशानंतर राज्य सरकार माथेरानमध्ये तीन महिने चाचणी घेण्यासाठी सात रिक्षा खरेदी करणार आहे. त्याची निविदा माथेरान नगरपरिषद काढणार असून प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या सल्ल्याने या रिक्षा खरेदी केल्या जाणार आहेत. मात्र आगामी काळात सात रिक्षा येणारे हे लक्षात घेऊन माथेरान नगरपरिषदेकडून देखील त्या रिक्षा उभ्या करण्यासाठी जागा निश्चित करण्याचे काम सुरु झाले आहे. दस्तुरी नाका येथे रिक्षांची स्टॅन्ड निर्माण करण्यासाठी मोजमापे घेण्यात आली आहेत. सध्या राज्य सरकरची मिनीबस थांबते. त्यांच्या समोर असलेल्या जकात वसुली नाका येथे मोकळ्या जागेवर त्या सात पर्यावरणपूरक रिक्षा थांबविल्या जाणार आहेत.

# पावसाचा जोर कायम; जनजीवन विस्कळीत

**रेवदंडा : प्रतिनिधी**

परतीचा पाऊस गेले तीन दिवस सततधार पडत असल्याने रेवदंडा परिसरात जनजीवन विस्कळीत झाले आहे. त्याचा व्यावसायिकांना आर्थिक फटका बसला आहे. बाजारात देवाण-घेवाण, खरेदी विक्री परतीच्या पावसाने ठप्प झाली आहे.

गेले तीन दिवस परतीच्या पावसाने जोर धरल्याने त्याचे विपरीत परिणाम रेवदंडासह आजुबाजूच्या गावाच्या बाजारपेठेत दिसून आले. नित्याने वर्दळीच्या असलेल्या रेवदंडा, वावे, बोर्ली या बाजारपेठेत तुरळक रेलचेल दिसून येत होती. बहुताशांने घरीच राहणे पंसत केले असल्याचे चित्र होते. नुकतीच गणेश उत्सवाची सांगता झाल्याने नित्याचे जनजीवनास प्रारंभ स्थानिक ग्रामस्थांना करता आला नाही. तीन दिवस पडत असलला पाऊस वाऱ्यासह येत असल्याने वातावरणात थंडपणा जाणवत आहे.

तीन दिवस पडत असलेल्या पावसाने मच्छीमार बांधवांनी सुध्दा होड्या समुद्रकिनारी उभ्या ठेवल्या आहेत. त्यामुळे मच्छीमार समुद्रात जात नसल्याने मच्छी मार्केटसुध्दा ओस पडले आहे. भाजी मार्केटमध्येसुध्दा नेहमीची गर्दी दिसत नाही.

अनेक दुकानदार स्वस्थ व मस्त असे आरामदायी दिवस ढकलत आहेत. गेले दहा पंधरा दिवस गणेश उत्सवाचे धावपळीने त्रासलेल्या व्यापारीवर्गाला सुध्दा एकप्रकारे विश्रांती प्राप्त झाली आहे. दरम्यान, आता पाऊस नकोसा झाला असून लवकरच पावसाने सुटी घ्यावी असे लोकांना वाटू लागले आहे. कोरोना पार्श्वभूमीवर मंदीने ग्रासलेल्या जनमाणसांना थोडी आर्थिक उबग, वेग घेण्याचा काळ असल्याने गेले तीन दिवस पडत असलेल्या पावसाचा त्रागा व्यक्त केला जात आहे. पाऊस जाण्याची वाट पाहत आहेत.

# नवरात्रौत्सव शांततेत साजरा करा

## खालापूर पोलीस निरीक्षक कुंभार यांचे आवाहन



**खालापूर : प्रतिनिधी**

आगामी नवरात्रोत्सव अनुषंगाने खालापूर पोलीस स्टेशन हद्दीतील पोलीस पाटील व नवरात्र उत्सव मंडळाचे पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन नवरात्र उत्सव शांततेत पार पाडण्याचे आवाहन पोलीस निरीक्षक कुंभार यांनी केले.

शासनाने वेळोवेळी नवरात्रौत्सव साजरा करणे बाबतच्या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचना तसेच ध्वनी प्रदूषणाबाबत उच्च न्यायालय यांनी दिलेल्या मार्गदर्शनपर सूचना, आवाजाची पातळी किती असावी याबाबत माहिती देऊन त्यांचे तंतोतंत पालन करण्याच्या सूचना दिल्या.

मूर्ती विटंबना होणार नाही यासाठी २४ तास स्वयंसेवक नेमण्यात यावेत तसेच मंडप मजबूत असावे, मंडपामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावावे, कायदेशीर विद्युत जोडणी असावी, ऑनलाइन परवानगी अर्ज करावा, तसेच संबंधित विभागाच्या परवानगी घ्यावी याबाबत मंडळांनी दक्षता घेणेबाबत सूचना देण्यात आल्या.

# निसर्गरम्य माथेरानमध्ये पावसाची संततधार



**कर्जत : प्रतिनिधी**

जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ असलेल्या माथेरान मध्ये चार दिवस संततधार पाऊस पडत आहे. गुरुवारी सकाळपासून सुरू असलेल्या पावसाने अजूनही उसंत घेतली नसून रविवार सकाळपर्यंत ५०७ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

माथेरानमध्ये अती पडल्याला पावसामुळे जुम्मापट्टी दरम्यान घाटात रस्त्यावर माती वाहून आली तर जमिनीची धूप झाल्या मुळे एक झाड रस्त्यावर पडले पण त्याचा वाहतुकीवर परिणाम झाला नाही. छोटे झाड जेसीबीच्या सहाय्याने बाजूला करून थोडा वेळ थांबलेली वाहतूक काही वेळातच पूर्वपदावर करण्यात आली. सप्टेंबर महिन्यात ऊन पावसाचा खेळ सुरू असतो तर इंद्रधनुष्याचेही दर्शन या वेळेत नागरिकांना होते, पण यंदा सप्टेंबरमध्ये पडत असलेल्या पावसाने जुलै महिन्याची आठवण करून दिली आहे. गेल्या दोन वर्षांपूर्वी एमएमआरडीएच्या माध्यमातून चांगले रस्ते कार्यकारी अभियंता अरविंद धाबे यांच्या देखरेखखाली करण्यास आल. यंदा माथेरानला ढगफुटी सदृश्य पाऊस पडल्याने माथेरान मधील काळोखी परिसरात अति पाण्याच्या लोंढयाने पेव्हर ब्लॉक निघाले. यांचा फटका एमएमआरडीएला बसला परंतू रस्त्याचे झालेले नुकसान ठेकेदाराने लगेचच दुरुस्त करून पूर्ववत करून दिले आहेत. या पावसात जरी कोणतीही दुर्घटना झाली नसली तरी मुस्लिम मोहल्ल्यात काही घरात पाणी गेल्याने नुकसान झाल्याच्या घटना घडल्या आहेत. अति पावसाने घाटातला रस्त्यावर देखील छोटे-मोठे खड्डे पडले आहेत. तर मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असल्याने माथेरान घाटातील धबधबे पुनर्जीवित झाले असून सप्टेंबर महिन्यात पर्यटक जुलैचा आनंद घेताना दिसत आहेत. साधारण सप्टेंबर महिन्यात पावसाळी पर्यटन हंगाम संपत असतो, परंतू या पावसामुळे अजूनही पर्यटक माथेरानकडे आकर्षित होताना दिसत आहेत.

# २००५पासूनच्या सरकारी कर्मचाऱ्यांनाही निवृत्ती वेतन द्यावे

## राज्य सेवानिवृत्त संघटनेचे अध्यक्ष मारणे यांची मागणी



**कर्जत : प्रतिनिधी**

संघटनेच्या माध्यमातून निवृत्ती वेतन धारकांना वेतन आयोग मिळण्यासाठी आपली संघटना नेहमीच प्रयत्नशील असते व यशस्वीदेखील होते. सरकारने २००५ पासून नोकरीत भरती झालेल्या नोकरदारांचे निवृत्ती वेतन बंद केले आहे. ते त्यांना लागू करावे कारण ३०-३५ वर्षे हे नोकरदार काम करतात. त्यांना निवृत्तीनंतर वेतनाची आवश्यकता असते. सर्व तालुका व जिल्हा संघटनांनी राज्य संघटनेला आर्थिक मदत करावी असे आवाहन महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त संघटनेचे अध्यक्ष एन. डी. मारणे यांनी येथे केले.

रायगड जिल्हा सेवानिवृत्त संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा कर्जतमधील रॉयल गार्डनच्या सभागृहात आयोजित केली होती. जिल्हाध्यक्ष धुरंधर मढवी यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी राज्याचे कार्याध्यक्ष वसंत वाबळे, सचिव लक्ष्मण टेंभे, संजय राऊत, रोहिणी क्षीरसागर, कर्जत तालुकाध्यक्ष रामचंद्र भवारे, सूर्यकांत चंचे आदी उपस्थित होते. तालुका उपाध्यक्ष ग. सि. म्हात्रे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. भवारे यांनी प्रास्ताविकात सभेच्या आयोजनाबाबतची माहिती विषद केली. सुरुवातीला संजय देशमुख यांनी इशस्तवन, स्वागत गीत आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील गीत सादर करून वातावरण निर्मिती केली. अहवाल वाचन एम. पी. वालेकर यांनी केले. त्यानंतर अनेक ठराव मांडण्यात आले. ते एकमताने मंजूर करण्यात आले. लक्ष्मण टेंभे यांनी हल्ली मोबाईलचा वापर सर्रास सुरू आहे. आपण सुद्धा त्याचा वापर करून दररोज संपर्कात राहिले पाहिजे असे सूचित केले. धुरंधर मढवी यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन श्यामला कदम यांनी तर आभार रमेश खैरे यांनी मानले. याप्रसंगी अरुण मोकल, वासुदेव इंगळे, आत्माराम देशमुख, आनंद जोशी, चंद्रकांत केळसकर, दिलीप पडवळ, अनंत खडे, मारुती बागडे, शीला घरत, संगीता मुरकुटे, जयराम पवाळी आदींसह जिल्ह्यातील निवृत्ती वेतनधारक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजप महिला मोर्चाकडून बालकांना खाऊवाटप



**कर्जत : बातमीदार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त कर्जत भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा यांच्या माध्यमातून पळसदरी येथील अंगणवाडी शाळेमध्ये बालकांना खाऊ वाटप करण्यात आले. अंगणवाडीमधील आदिवासी आणि गरीब बालकांच्या समस्या ऐकून घेऊन त्यांना दत्तक घेण्याचा निर्धार भाजप महिला मोर्चा यांच्याकडून या वेळी जाहीर करण्यात आला.

पळसदरी येथील अंगणवाडी शाळेमध्ये भारतीय जनता पक्षाच्या महिला मोर्चाचे वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त खाऊ वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी अंगणवाडी बालकांच्या समस्या भाजप महिला मोर्चाच्या पदाधिकारी यांनी समजून घेतल्या. त्या वेळी महिला मोर्चाचे वतीने महिला तालुका अध्यक्ष स्नेहा गोगटे यांनी महिला मोर्चा अंगणवाडी मधील बालकांना दत्तक घेण्यात येईल असे आश्वासन दिले. त्यांनी आदिवासी बालकांच्या समस्या जाणून घेतल्या आणि अंगणवाडी दत्तक घेण्यातून मुलांना या उपक्रमातून चांगल्या सेवा मिळतील यात शंका नाही असा आशावाद यावेळी गोगटे यांनी व्यक्त केला. यावेळी कर्जत नगरपरिषदमधील नगरसेविका आणि भाजप महिला मोर्चा तालुका उपाध्यक्ष स्वामींनी मांजरे, महिला मोर्चा तालुका सरचिटणीस वर्षा बोराडे यांनी माहिती दिली. दरम्यान, या वेळी प्रीती तिवारी, सुषमा ढाकणे, शर्वरी कांबळे तसेच स्मिता सविते, महिमा राजभर, रोहिणी उगले यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद लाभला.

# धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे कोर्लई-सावली रस्ता स्वच्छ



**मुरुड : प्रतिनिधी**

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे मुरुड तालुक्यातील श्रीसदस्यांनी कोर्लई ते सावली रस्त्याच्या दोन्ही बाजूस वाढलेली झाडी व रस्तावर आडव्या येणाऱ्या फांद्या कापून रस्ता स्वच्छ व अपघातमुक्त करण्यात आला.

मुरुड तालुक्यात पावसाचे प्रमाण खूप असल्याने रस्त्यालगत झाडे वाढतात व पाने फांद्यामुळे पलीकडचा रास्ता दिसेनासा होतो. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता असते ते होऊ नये म्हणूनच रस्त्याची स्वच्छता मोहीम प्रतिष्ठानने राबविली आहे. दरम्यान, सार्वजनिक बांधकाम खात्याचे रस्त्यावरील झाडी झुडपे काढण्याचे काम आहे. परंतु हा विभाग याकडे लक्ष देत नाही, असा ग्रामस्थांचा आरोप आहे. याची दखल मात्र धर्माधिकारी प्रतिष्ठाने घेऊन पावसाळ्यात रस्त्याच्या दोन्ही बाजूस वाढलेली झुडपे काढून लोकांच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी बहुमूल्य पाऊल उचलून मोठा दिलासा दिला आहे. आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली कोर्लई ते सावलीचे सर्व रस्ते ५८७ श्रीसदस्यांनी स्वच्छता मोहीम राबून चकाचक केले आहेत. दरम्यान, तालुक्यातून गोळा झालेला ८० टन ओला कचरा व दोन टन सुका कचरा डम्पिंग ग्राउंडवर टाकण्यात आला आहे. आप्पासाहेब यांनी आध्यात्म, शिक्षण, आरोग्य, समाजप्रबोधन आणि व्यसनमुक्ती या क्षेत्रांत त्यांनी प्रभावीपणे प्रबोधनाचे काम केले. योग्यवेळी भविष्याचा वेध घेत मानवाच्या हितासाठी पर्यावरण संवर्धनाच्या विचाराला प्राधान्य दिले. देश-परदेशातील हजारो बैठकांच्या माध्यमातून लाखो अनुयायांच्या मनात तो विचार शास्त्रशुद्ध पद्धतीने रुजविण्यात आप्पासाहेबांनी निरुपणातून संपादन केलेले यश अलीकडच्या काळातील मोठ्या सामाजिक परिवर्तनाच्या यशस्वी चळवळीचे प्रत्यंतर देणारे आहे. तोच वारसा सचिनदादा धर्माधिकारी पुढे चालवत आहेत. सचिनदादांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील स्वच्छता मोहीम राबविण्यात आल्या. दरम्यान, सामूहिक श्रमदानातून स्वच्छतेचा विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवून आपल्या सद्गुरुंना त्यांच्या वाढदिवसाची अनोखी भेट देण्यासाठी रविवारी एकाच दिवशी महाराष्ट्रातील श्रीसदस्यांनी घराबाहेर पडून शहरातील रस्ते अत्यंत शांतपणे, शिस्तबद्ध पद्धतीने स्वच्छ केले आहेत. याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मुंबई-पुणे महामार्गावर दोन अपघातांमध्ये एक ठार

## एक जण जखमी; रुग्णालयात दाखल

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर दोन अपघातात एक ठार एक जखमी झाला असून बसने कारला पाठीमागून धडक दिल्याने डॉ.सरदार हे जखमी झाल्याने खोपोली येथील खासगी रुग्णालयात त्यांना दाखल करण्यात आले आहे.तर दुसरा अपघात जुन्या महामार्गावर पोयंजे गावाजवळ घडला टँकर पलटी होऊन टँकरचा चालक टँकर खाली दबून जागीच ठार झाला आहे.

दोनही अपघात महामार्गावर पाणी साठून निसरडा झाल्याने वाहने घसरून समोरच्या वाहनांना धडकत आहेत किंवा निसरड्यामुळे वाहनाला ब्रेक लावला असता मार्ग सोडून घसरत जात पलटी होत आहेत. दरम्यान, खोपोली शहरातील पशुवैद्य डॉ. सरदार हे त्यांच्या ताब्यातील कार चौक बाजूकडे मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरुन घेऊन जात असताना वावंढळ गावानजीक हा अपघात झाला आहे.




## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली सामाईक मिळकत हि त्यांचे विद्यमान मालक **श्री. हसूराम नारायण घरत व इतर** यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे **अशिल** यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक **श्री. हसूराम नारायण घरत व इतर** यांनी आमच्या अशिलांना लिखित स्वाक्षरी करून संमती दर्शवली आहे. व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरून हि वर्तमानपत्रात जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन: मौजे : हरिश्चंद्र पिंपळे-उरण जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे. आर. चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १९ | १ | २ | ०-५२-३० | ७.१२ |
| | | एकूण क्षेत्रफळ | ०-५२-३० | |

वर वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक **श्री. हसुराम नारायण घरत व इतर** यांच्या मालकीची व ताबे कब्जाची आहे . सदरील मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविला आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क , हितसंबंध, बोजा,गहाण, दान, लिज,पोटगी, हवाला,साठेकारार, खरेदी, मेंटेनन्स मेहेर, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क , हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींना सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधितांच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आणून द्यावी . या प्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आम्ही सदर व्यवहार पूर्ण करू व नंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे

**दिनांक : १९ सप्टेंबर २०२२**

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड - क्रमांक ३३/३४, सेक्टर २२ कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड- ४१०२०६ मो.क्र. ९९२०४ ७५८०१

# मोरबे धरण पूर्ण भरण्याच्या मार्गावर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मागील काही दिवसांपासून शहरात व मोरबे पाणलोट क्षेत्रात पावसाचे प्रमाण चांगले असून यंदाही गेल्या वर्षीप्रमाणे धरण भरण्याची शक्यता आहे. मोरबे धरण ९६.२३ टक्के भरले असून आता धरण १०० टक्के भरण्यासाठी फक्त ४०० मिमी पावसाची आवश्यकता आहे, तर धरणात ऑगस्ट २०२३पर्यंत पुरेल एवढा जलसाठा झालेला आहे. गेल्या वर्षी २९ सप्टेंबरला १०० टक्के धरण भरले होते. त्यामुळे यंदाही धरण भरणार असल्याचा विश्वास नवी मुंबई महापालिका प्रशासनाने व्यक्त केला आहे.

मोरबेच्या पाण्यावर जलसंपन्न शहर म्हणून नावलौकीक मिळालेले नवी मुंबई महापालिकेचे मोरबे धरण अद्याप ९६ टक्के भरले असून धरणात ऑगस्ट २०२३पर्यंत पुरेल एवढा पाणीसाठा झाला आहे. नवी मुंबई शहर व मोरबे पाणलोट क्षेत्रात यंदा संपूर्ण जून महिन्यात पाऊस पडला नाही. पावसाविना जून महिना कोरडाच गेला होता. त्यामुळे गेल्यावर्षीच्या तुलनेत मोरबे धरणाची पाणीपातळी ५ मीटर खाली गेला होती. मोरबे धरण परिसरात गेल्यावर्षीच्या तुलनेत कमी पाऊस होत असल्यामुळे नवी मुंबई शहरावर पाणीकपातीचे संकट निर्माण झाले होते, परंतु जूनमधील पावसाने हात आखडता घेतला होता त्याची भर जुलै ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यात भरून काढली आहे.

## दमदार पावसामुळे ९६.२३ टक्के जलसाठा



**आतापर्यंत धरणात झालेला पाऊस : ३२२४.२० मिमी.**
**धरणातील एकूण जलसाठा : ९६.२४%**
**शहरात कधीपर्यंत पाणीपुरवठा करता येईल : २२ ऑगस्ट २०२३**

यंदा पावसाळ्यापूर्वी फक्त १५ ऑगस्ट २०२२पर्यंत पुरेल एवढेच पाणी धरणात होते. धरण भरण्यासाठी जवळजवळ ३८०० ते ४००० मिमी पावसाची आवश्यकता होती. नवी मुंबई शहराला पाणीपुरवठा करणारे मोरबे धरण गेल्यावर्षी दमदार पावसाने २९ सप्टेंबर २०२१ ला पूर्ण भरले होते. यंदा पावसाचे प्रमाण अनिश्चित होते, परंतु आतापर्यंतच्या झालेल्या पावसाची सरासरी पाहता मोरबे धरण यंदाही पूर्ण भरेल असे प्रशासनाचे मत आहे. मागील काही दिवसापासून पावसाचा जोर पुन्हा सुरू झाल्याने धरण पुढील काही दिवसातच भरेल, असे मत मोरबे धरण प्रकल्प अभियंता वसंत पडघन यांनी सांगितले. मोरबे धरण परिसरात ऑक्टोबरपर्यंत पाऊस पडतो. त्यामुळे नवी मुंबईकरांची पाणी चिंता मिटली आहे .

**मोरबे पाणलोट क्षेत्रात मागील काही दिवसांपासून पावसाचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे धरण काही दिवसांत भरेल अशी खात्री आहे.**
**-अरविंद शिंदे, कार्यकारी अभियंता, मोरबे प्रकल्प**

# पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त भाजप युवा मोर्चाचे रक्तदान शिबिर




**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सेवा पंधरवडा अंतर्गत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप युवा मोर्चा नवी मुंबई जिल्ह्याच्या वतीने १७ व १८ सप्टेंबर २०२२ रोजी सीबीडी-बेलापूर, सिवूड-करावे, नेरूळ (पश्चिम), वाशी, ऐरोली, दिघा या ठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आलेले असून, एकूण १००० बॉटल रक्तदानाचा संकल्प युवा मोर्च्याच्या वतीने करण्यात आलेला आहे.

शनिवारी सीबीडी-बेलापूर मंडळापासून रक्तदान शिबिराची सुरुवात झाली. या वेळी भाजप प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील यांनी उपस्थित राहून रक्तदात्यास प्रोत्साहन देत प्रमाणपत्र वितरित केले. सीबीडी-बेलापूर मंडळात एकूण १२८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यासाठी युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष सलील गवळी, मंडळ अध्यक्ष अजय पासवान, जिल्हा सचिव कल्पेश कुंभार यांनी विशेष मेहनत घेतली.

# कामगार सेनेच्या प्रमुख सल्लागारपदी मंगल घरत

**नवी मुंबई : बातमीदार**

भाजप कामगार आघाडी प्रणित छत्रपती शिवाजी महाराज कामगार सेनेच्या राष्ट्रीय प्रमुख सल्लागारपदी भाजपा महिला मोर्चाच्या मंगल घरत यांची नेमणूक करण्यात आली. या वेळी कामगार संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय पवार उपस्थित होते.

सध्या कामगारांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. हे प्रश्न सोडवण्याचा, कामगारांना व त्यांच्या कुटुंबीयांना न्याय देण्याचा प्रयत्न या कामगार सेनेच्या माध्यमातून केला जाईल, असे घरत यांनी सांगितले.



# खारघर मेट्रोपर्यंत रस्ता तयार करावा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

थोड्या महिन्यात मेट्रो ट्रेन सुरू होणार आहे. त्यामुळे सेक्टर ४ येथील रहिवाश्यांसाठी जाण्या-येण्यासाठी रस्ता बनविण्यात यावा, अशी मागणी भाजप नेते प्रभाकर घरत यांनी सिडकोकडे निवेदनाद्वारे केली आहे. त्यांनी सिडकोच्या खारघर कार्यकारी अभियंत्यांना निवेदन दिले आहे.

**भाजप नेते प्रभाकर घरत यांची मागणी**

उत्सव चौक मेट्रो स्टेशन सेक्टर ४ येथील रहिवाशांना अर्धा किमी अदिनाथ सोसायटी सेक्टर ३ पायी प्रवास करावा लागतो आणि उत्सव चौक मेट्रो स्टेशनपासून अर्धा किमी उत्सव चौकापर्यंत पायी प्रवास करावा लागतो. त्यासाठी तेथील नागरिकांसाठी छोटा स्काय वॉक किंवा काँक्रिटचा एक १५० मिटरचा रस्ता बनवून देण्यात यावा, अशी मागणी घरत यांनी सिडकोच्या खारघर कार्यकारी अभियंत्यांना दिलेल्या निवेदनात नमूद केली आहे.

# कामोठ्यात योग शिबिर; आमदार प्रशांत ठाकूर यांचा सहभाग

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

पतंजली योग समिती पनवेल विभागाच्या वतीने एकदिवसीय मोफत (इंटीग्रेटेड) योग शिबिर रविवारी (दि. १८) कामोठे येथे आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी सहभागी होत योगसाधना केली. आयोजकांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.

कामोठे सेक्टर १५ येथील आगरी समाज हॉलमध्ये झालेल्या या शिबिरामध्ये पतंजली योग समिती हरिद्वार येथील केंद्रीय प्रभारी स्वामी परमार्थदेव, युवा भारत केंद्रीय प्रभारी आचार्य चंद्रमोहन यांनी उपस्थितांना योगसाधना शिकविली.





राज्य कार्यकारिणी सदस्य आर. पी. यादव यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या योग शिबिरात केंद्रीय युवा भारत सहप्रभारी भाई सचिन, राज्य प्रभारी मुंबई सुरेश यादव, पोपटराव कदम, अभय काभरा, भाजप उत्तर भारतीय मोर्चाचे उत्तर रायगड अध्यक्ष तथा पतंजली योग समितीचे युवा भारत पनवेल जिल्हा प्रभारी जितेंद्र तिवारी, रवींद्र मोरे, रामबाबू पात्रो, संजय यादव, राजेंद्र सिंग, सुशमा, सरिता ठाकूर, ममता शुक्ला, सुचित्रा मंडल, रूपम, दिपा पांडे आदी उपस्थित होते.

या शिबिरामध्ये असंख्य महिला व पुरुषांनी सहभागी होत योगसाधना केली.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी मनोगत व्यक्त करताना मानवी आरोग्याच्या दृष्टिकोनातून योगसाधनेचे असलेले महत्त्व विषद केले.

# 'ग्राइंडवेल नॉर्टन'मध्ये भगवान विश्वकर्मा जयंती

**उरण : वार्ताहर**

ग्राइंडवेल नॉर्टन लिमिटेड मोरा (उरण) येथे शनिवारी (दि. १७) मेंटेनन्स डीपार्टमेन्टमध्ये भगवान विश्वकर्मा जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. पूजा आरती झाल्यावर सर्वांना पेढे, प्रसाद वाटण्यात आला. लक्ष्मी नारायण तिवारी या भटजीने यथासंग पूजा सांगितली व पुजेचे महत्त्व सांगितले.



ग्राइंडवेल नॉर्टन कंपनीचे मॅनेजर सुरजित रे यांच्या हस्ते भगवान विश्वकर्मा प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ऑ ग्राइंडवेल नॉर्टन कंपनीचे ऑपरेशन-बाँडेड अ‍ॅण्ड थीन व्हीलचे हेड कमलजीत सिंह यांच्या हि हस्ते पूजा करण्यात आली. मेंटेनन्स डीपार्टमेन्टचे मॅनेजर विनायक डेरवणकर यांच्या हस्ते आरती करण्यात आली. मेंटेनन्स डीपार्टमेन्टचे मॅनेजर प्रसन्ना दांडेकर यांच्या श्रीफळ वाढविण्यात आले.

या वेळी ग्राइंडवेल नॉर्टन कंपनीचे ऑपरेशन-बाँडेड अ‍ॅण्ड थीन व्हील चे हेड कमलजीत सिंह, मॅनेजर सुरजित रे अ‍ॅडमिनचे मॅनेजर आय. बी. सिंह मॅनेजर विनायक डेरवणकर, मॅनेजर प्रसन्ना दांडेकर, मॅनेजर मनोज सिंह, मॅनेजर आय. बी. सिंह, प्रोडक्शन मॅनेजर अमित पाटील, सीएसडी डीपार्टमेन्टचे सिनिअर मॅनेजर सचिन वैद्य, मेंटेनन्स डीपार्टमेन्टचे मॅनेजर मनोज सिंह, आशुतोष चत्तर व सर्व इंजिनीअर्स यांच्यासह कामगार, कंत्राटी कामगार, कामगार प्रतिनिधी उपस्थित होते.

# युवा महोत्सवात पनवेलच्या पिल्लई कॉलेजची गगनभरारी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई विद्यापीठाच्या ५५व्या युवा महोत्सवाच्या महाअंतिम फेरीत नवीन पनवेल येथील पिल्लई कॉलेजने गगनभरारी घेतली आहे. भारतीय सुगम संगीत स्पर्धेत पिल्लई कॉलेज नवीन पनवेलने सुवर्णपदक, भारतीय समूहगीत गायन स्पर्धेत रौप्यपदक, पाश्चात्य समूहगीत गायन स्पर्धेत रौप्यपदक तर पाश्चात्य एकेरी स्पर्धेत विशेष प्राविण्य पदक पटकावून पनवेलकरांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

मुंबई विद्यापीठांतर्गत युवा महोत्सव २०२२च्या महाअंतिम सोहळ्याची सुरुवात १३ सप्टेंबर रोजी भारतीय समुहगीत गायन स्पर्धेने मुंबई फोर्ट येथील मुंबई वीद्यापीठाच्या जहांगीर कॉन्व्होकेशन हॉलमध्ये झाली. मुंबई विद्यापीठाच्या दीक्षान्त सभागृहात राज्यपाल भगतसिंग कोशारी यांच्या हस्ते ५५ व्या युवा महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी राज्यपालांच्या हस्ते वयाची ७५ वर्षे तसेच चित्रपट, रंगभूमीवरील ५० वर्षे पूर्ण केल्याबद्दल ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांचा निवेदिता सराफ यांच्यासह सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला मुंबई विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ दिगंबर शिर्के, विविध विभागांचे अधिष्ठाता, शिक्षक तसेच युवा महोत्सवात सहभागी होणारे विद्यार्थी कलाकार उपस्थित होते. विद्यापीठाचे सांस्कृतिक समन्वयक डॉ. निलेश सावे यांनी सूत्रसंचालन केले. तर डॉ. सुनील पाटील यांनी आभारप्रदर्शन केले.



यावर्षी मुंबई विद्यापीठाच्या ५५ व्या युवा महोत्सवात भारतीय समूहगीत गायन स्पर्धेत अमृथा नायर, क्रितीका शिवसुब्रमण्यम, हर्षल पाटील, हिमानी विहारवाला, ध्रुव शर्मा, मेहताब सिंग या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत व लोककला गीताचे उत्कृष्ट सादरीकरण करून द्वितीय क्रमांक पटकावला. तर अमृथा नायर या विद्यार्थिनीने भारतीय सुगम संगीत स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.

यासोबतच पाश्चात्य समूहगीत स्पर्धेत सिध्दार्थ मोघे, शिवज्योतिस आचार्य, डीऑन जॅक्सन, जेनी जेकॉब, ज्योतिका नायर, वैष्णवी पिल्लई या विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. तर पाश्चात्य एकेरी गायन स्पर्धेत डीऑन जॅक्सन या विद्यार्थ्याने विशेष प्राविण्य पटकावले. विद्यार्थ्यांना संगीत दिग्दर्शक नवीन मोरे, साहिल रेळेकर, मनोहित मेनन या संगीत प्रशिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तर प्राध्यापिका रम्या कुमार यांनीही विद्यार्थ्यांसाठी विशेष मेहनत घेतली.

# केबीपी कॉलेजमध्ये आजपासून कर्मवीर सप्ताह

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) कॉलेज व मॉडर्न स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त कर्मवीर सप्ताहाचे आयोजन केले आहे. १९ सप्टेंबरपासून कर्मवीर सप्ताहाला सुरुवात होणार आहे.

केबीपी कॉलेजने या सप्ताहामध्ये विविध उपक्रम, कार्यक्रम घेण्याचे निश्चित केले आहे. या सप्ताहामध्ये वर्गखोल्या व परिसर स्वच्छता, भिंतीपत्रिका प्रदर्शन, कर्मवीरायण वाचन, शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा रक्तदान शिबीर, रक्तगट शिबीर, कर्मवीर रथयात्रा, कर्मवीर भाऊराव पाटील लघुपट प्रेक्षपण व मोखाडा आश्रम शाळेला शैक्षणिक साहित्य व जीवनाश्यक वस्तूंची भरीव मदत अशा विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे.

दरम्यान, २२ सप्टेंबर रोजी कर्मवीर जयंतीदिनी सामाजिक कार्यकर्त्या पद्मश्री डॉ. राणी बंग यांच्या व्याख्यानपर कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. अशी माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांनी दिली.

# नेरुळमध्ये रंगला काव्य जागर; रसिकांची दाद

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ येथील स्टर्लिंग कॉलेज येथील भव्य अशा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या हॉलमध्ये शनिवारी (दि. १७) प्रमोद कर्नाड यांच्या अध्यक्षतेखाली गझल व कवितांचा कार्यक्रम झाला. गझलकार आप्पा ठाकूर, महाराष्ट्र कवी जितेंद्र लाड, डॉ. अशोक पाटील, भाऊसाहेब शिंगाडे, रायगड भूषण एल. बी. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत, प्रा. रवींद्र पाटील निर्माते आणि सूत्रधार असलेला हा कार्यक्रम रसिकांनी सर्वच कवितांना वन्स मोअर देत दाद दिली.




सुरुवातीला यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमा पूजन करण्यात आले. मान्यवरांचे तुळस आणि गुलाब देऊन सत्कार करण्यात आले. कविता ही बारसे करण्यापासून ते अंत्यविधीच्या यात्रेतदेखील सोबत असते, लग्न प्रसंगी हळदीत, वाढ दिवसालादेखील कविता गाता येते, ती आम्ही गातो असे कवी वैभव वर्हाडी यांनी या वेळी नमूद केले.

कवी लाड यांनी आई तर शंकर गोपाळे यांनी बाप या वर कविता सादर केली. वैभव वर्हाडी यांनी, माझ्या मायेची जिंदगी सारी बणग्या पाखडण्यात..टरफल्या गत गेली म्हणत काळजास हात घातला. नंतर रुद्राक्ष व प्रवीण बोपुलकर यांनी.. त्यावर कळस नेत..टाळ्या आणि शिट्या घेतल्या. दुसऱ्या फेरीत निवेदक आणि शिव व्याख्याते प्रा. रवींद्र पाटील यांनी कवी विठ्ठल शिंदे यांची... शिवरायांची कविता घेऊन...., मुलाकडून छत्रपतींचा गजर करून घेतला. रुद्राक्ष पातारे यांनी. आबेद शेख यांची सुगंधी बाग आहे ती ही गझल घेऊन.. वन्स मोरचा कहर झाला. पाटील यांनी तुझ्या त्या पैंजणाची छान, तुझ्या त्या काकणाची खण या शेरला..रुद्राक्ष यास पुन्हा घेऊन...रसिकांचे गोड भार.. पूर्ण केलेत. जितेंद्र लाड यांनीदेखील..., लेकीची कविता घेऊन सर्व प्रेक्षकांना अंतर्मुख केले.

प्रमोद कर्नाड यांनी, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानकडून ग्रंथ भेट देऊन कवींचे आभार मानले. आप्पा ठाकूर यांनी कविता..आपणास राखेतून ही जन्म घेण्यास सक्षम करते असे सुरेख विवेचन केले. श्री व सौ. मगदूम, अशोक पालवे, ललित पाठक, जयवंत पाटील, शशिकांत म्हात्रे, एस. एम. पाटील आदी उपस्थित होते. कवी वैभव वर्हाडी यांच्या आभार प्रदर्शन आणि राष्ट्रगीताने कार्यक्रम झाला.

# पनवेलमध्ये वृद्ध व्यक्तीची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

पोलीस असल्याची बतावणी करून वृद्ध व्यक्तीची फसवणूक केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.

दत्तात्रय घाग (वय ८६) हे फेरफटका मारत असतांना के मॉल, तक्का रोड, पनवेलच्या गेट समोरील रस्त्यावर दोन अनोळखी व्यक्ती त्यांच्या जवळ आले व आपण पोलीस असल्याची बतावणी करून त्याच्या हातातील अर्ध्या तोळ्याची सोन्याची अंगठी व गळ्यातील एक तोळे वजनाची सोन्याची चैन काढून ठेवण्यास सांगितले. याचवेळी दोघांनी हातचलाखीने फसवणूक करून जवळपास ४५ हजार रुपये किमतीचा ऐवज काढून घेऊन ते पसार झाले. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

वाचाल तर वाचाल!
जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...

जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...

महिन्याच्या पहिल्या आणि चौथ्या रविवारी 'दैनिक राम प्रहर'च्या अंकात वाचा नवे पाक्षिक सदर वाचाल तर वाचाल. या सदरात दर पंधरवड्याला आमच्या प्रिय वाचकांच्या भेटीला आणणार आहोत.

साहित्यिकांची आवडती पुस्तके येत्या २५ सप्टेंबर २०२२ रोजीच्या रविवारी वाचूया दिलीप प्रभाकर गडकरी (कर्जत) यांच्या आवडत्या पुस्तकांविषयी त्यांच्याच लेखातून.



# स्वच्छ सागर, सुरक्षित सागर मोहिमेला प्रतिसाद

## ■ केंद्र शासन आणि जिल्हा प्रशासनाचा संयुक्त उपक्रम; किनारे चकाचक!

**अलिबाग : जिमाका**

आपण आपले घर आणि आजुबाजूचा परिसर जसे स्वच्छ ठेवतो तसेच आपला सागर किनाराही स्वच्छ ठेवण्याच्या संकल्पने प्रेरित होऊन रायगडकरांनी जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध सागर किनाऱ्यांवर स्वच्छ सागर, सुरक्षित सागर मोहीम उत्साहात राबविण्यात आली.

जिल्ह्यातील अलिबाग, मुरुड, श्रीवर्धन या तालुक्यातील मुरुड, काशिद, अलिबाग, आवास, किहीम, थळ, वरसोली, आक्षी, नागाव, रेवदंडा, श्रीवर्धन, दिवेआगार, हरिहरेश्वर, आरावी या समुद्रकिनाऱ्यांवर नुकताच एकाच वेळी हा उपक्रम राबविण्यात आला.

विविध सागरी किनाऱ्यावर आयोजित या उपक्रमाच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, महसूल विभागाचे सहसचिव अजित देशमुख, अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्के-पाटील, स्नेहा उबाळे, प्रांताधिकारी प्रशांत ढगे, अमित शेडगे, जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके, कार्यकारी अभियंता जगदीश सुखदेवे, जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी निलेश घुले, राजेंद्र भालेराव, शुभांगी नाखले, पोलीस उपअधीक्षक जगदीश काकडे, जिल्हा प्रशासन अधिकारी शाम पोशट्टी, तहसीलदार मीनल दळवी,



सचिन गोसावी, मुख्याधिकारी अंगाई साळुंखे, रोहन शिंदे, विराज लबडे, मनोज उकिर्डे, पंकज भुसे, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी गोविंद वाकडे, सीडीपीओ गीतांजली पाटील, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे जयवंत गायकवाड, संबंधित गटविकास अधिकारी, मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, वन परिक्षेत्र अधिकारी, विस्तार अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, सागरी सीमा मंचचे रघुजीराजे आंग्रे, वरसोली ग्रामपंचायत सरपंच प्रमिला भाटकर, माणुसकी प्रतिष्ठानचे डॉ. राजाराम हुलवान, सुशील साईकर, रोटरी क्लब, लायन्स क्लब या व इतर स्वयंसेवी संस्था, दिवेआगर येथील सुवर्ण गणेश मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष महेश पिळणकर व इतर पदाधिकारी, शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### स्थानिक जनतेचे सहकार्य

*जिल्हा प्रशासनातर्फे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त जिल्ह्यातील स्वच्छ सागर, सुरक्षित सागर हे अभियान मुरुड, काशिद, अलिबाग, आवास, किहीम, थळ, वरसोली, आक्षी, नागाव, रेवदंडा, श्रीवर्धन, दिवेआगार, हरिहरेश्वर, आरावी या समुद्रकिनाऱ्यांवर राबविण्यात आले. सागरी किनाऱ्यावरील कचरा संकलनासाठी शाळा तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी, नागरीक, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, शासकीय अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.*



केंद्र शासनाचे पृथ्वी मंत्रालय व रायगड जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. सागरी जीवन हादेखील मानवी जीवनाचा अविभाज्य घटक असून त्याची स्वच्छता राखणे, आपली सर्वांची नैतिक जबाबदारी आहे. या भावनेतूनच स्वच्छता करण्यात आली.

### स्वच्छता राखण्याचा दिला संदेश

***उपक्रमामुळे सागर किनाऱ्यांची स्वच्छता ही एक लोकचळवळ बनणार आहे. रायगडकरांच्या या उपक्रमास उदंड प्रतिसाद मिळाला आहे. दरम्यान, सध्याच्या काळात वातावरण बदलाचा आपण अनुभव घेतोय. घराबरोबरच बाहेरील परिसर स्वच्छ न ठेवल्यास त्याचे दुष्परिणाम सर्व जैविक सृष्टीला निश्चितच भोगावे लागतील. सागर परिसंस्थेतही मानव जातीकडून कळत-नकळत प्रदूषण केले जात आहे. कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्हा प्रशासनाकडून स्वच्छतेचा संदेश देण्यात आला.***

# मुंबई-गोवा महामार्गावर सतत वाहतूक कोंडी

## वाकण फाटा परिसरात वाहनांच्या रांगा



**नागोठणे : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक कोंडीचा त्रास रविवारी पुन्हा एकदा प्रवाशांना बसला आहे महामार्गावर वाकण फाटा येथे वाहतूक कोंडी झाली. तीन ते चार किलोमीटर पर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या या वेळेस पहावयास मिळाल्या. दरम्यान, महामार्गावर सतत वाहतूक कोंडी होत असून प्रवासी आणि परिसतरातील नागरिकांना याचा त्रास सहन होत आहे.

वाकण येथील पुलावर एक ट्रक बंद पडल्याने आणि वाकण येथे महामार्गवर पडलेल्या असंख्य अशा मोठ मोठ्याला खड्ड्याने ही वाहतूककोंडी झाली. वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न वाहतूक पोलिसांकडून सुरू होता. रविवारी सुटीच्या दिवस असल्याने पर्यटनास बाहेर पडलेल्या प्रवाशांना मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. रविवारी सकाळी ८.३० झालेली वाहतूककोंडी सोडविण्यासाठी साधारणपणे १०.३० वाजले. यामध्ये जवळपास पंधरा वाहतूक पोलीस मेहनत घेत असल्याचे दिसून आले.

> **वाकण येथे दोन वाहने बंद पडल्या कारणास्तव या ठिकाणी वाहतूककोंडी झाली होती, मात्र वाहतूक पोलिसांनी विशेष मेहनत घेऊन वाहतूक सुरळीत केली आहे.**
>
> **- रमेश पाटील, सहाय्यक फौजदार वाहतूक विभाग**


# शिंदे गट नागोठणे उपविभागप्रमुखपदी आकाश मढवी यांची नियुक्ती

**नागोठणे : प्रतिनिधी**

आमदार महेंद्र दळवी यांच्या आदेशाने व जिल्हा प्रमुख राजा केणी, तालुकाप्रमुख मनोजकुमार शिंदे तसेच विभाग प्रमुख प्रवीण ताडकर यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना शिंदे गटाच्या नागोठणे उपविभाग प्रमुखपदी आकाश मढवी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

दरम्यान, शिवसेनेच्या धोरणानुसार २० टक्के राजकारण व ८० टक्के समाज कारणाचे चित्र सध्याच्या उद्धव ठाकरे गटाने बदले असून सामाजिक कार्याकडे पूर्ण पणे पाठ फिरविली आहे. तेच चित्र नागोठणे विभागात बदलण्यासाठी आपण शिंदे गटात प्रवेश केल्याचे मढवी यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

मढवी यांनी युवासेनेच्या माध्यमातून आजवर त्यांनी अनेक सामाजिक कार्य केले. कोरोना कालावधीत अनेकांना मदतीचा हात दिला. मास्क, सॅनिटायझर, गरीब गरजूंना धान्य वाटप तसेच चक्री वादळामध्ये तळेवाडी आदिवासी भागात पाहणी करून नुकसान भरपाई मिळवून दिली. जे रेशन धान्यापासून वंचित होते त्यांना रेशन मिळवून दिले. समाज कार्यात नेहमी अग्रेसर असणाऱ्या आकाश मढवी यांच्या कामाची दखल घेत त्यांची नागोठणे उपविभाग प्रमुखपदी निवड झाल्याबद्दल सर्वच स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात येत आहे.



# नेरळमध्ये भाजपतर्फे रक्तदान शिबिर उत्साहात

**कर्जत : बातमीदार, प्रतिनिधी**

नेरळ शहर भाजपच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. मुंबई महापालिकेच्या जोगेश्वरी येथील ट्रॉमा रुग्णालयाच्या बाळासाहेब ठाकरे रक्तपेढीकडून रक्त संकलन करण्यात आले. यावेळी ८५ रक्तदात्यांनी रक्तदान करून शिबिर यशस्वी केले.

शिबिराचे उद्घाटन नेरळ ग्रामपंचायतीच्या सरपंच उषा पारधी यांचे हस्ते झाले. भारतीय जनता पक्षाचे कर्जत तालुका अध्यक्ष आणि नेरळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच मंगेश म्हसकर यांच्या पुढाकाराने आयोजित केलेल्या या शिबिराच्या वेळी नेरळ ग्रामपंचायतीचे सदस्य गीतांजली देशमुख,संतोष शिंगाडे, शंकर घोडिंदे, तसेच भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते. तसेच जिल्हा उद्योग






सेलचे अध्यक्ष मंदार मेहंदळे, कर्जत पंचायत समितीचे माजी सदस्य नरेश मसणे, भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते विजय पवार,दिनेश पेटकर, बंडू काळे, अनिल जैन, अनिल पाटील, संभाजी गरुड, प्रकाश पेमारे, संदीप म्हसकर आणि भाजप युवा मोर्चा यांचे पदाधिकारी यांचीही उपस्थिती होती.

नेरळ येथील डॉ. बापूराव धारप सभागृहात नेरळ शहर आणि सार्वजनिक रक्तदाते राजाभाऊ कोठारी यांच्या माध्यमातून रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. शिबिराला पनवेलचे आमदार आणि भाजप जिल्हा अध्यक्ष प्रशांत ठाकूर, जिल्हा चिटणीस रमेश मुंढे, किसान मोर्चाचे सुनील गोगटे, नितीन कांदळगावकर, संजय कराळे यांनी भेट दिली.

जोगेश्वरी येथील ट्रॉमा रुग्णालयाचे बाळासाहेब ठाकरे रक्तपेढी यांच्या रक्त संकलन टीमकडून रक्त संक्रलित केले. त्यावेळी या टीमच्या श्रद्धा बिर्जे, प्रवीण महाजन, रेणुका धुमळे, वृषाली नेसुरकर, पांडुरंग कोमु यांनी हे काम केले. या शिबिरात ८५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदात्यांना या वेळी गौरविण्यात आले.

# माणगाव वाहतूक पोलीस शाखेतर्फे वाहनचालकांचा सन्मान

**माणगाव : प्रतिनिधी**

देशातील दळण वळण क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणजे वाहन चालक होय. या वाहन चालकांचा गुणगौरव करण्यात आला.

रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे व जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी पोलिस निरिक्षक सूवर्णा पत्की यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव वाहतूक पोलीस शाखेतर्फे वाहन चालकांचा चालक दिनानिमित्त गुलाबपूष्प देऊन सन्मान करण्यात आला तसेच या वाहन चालकांना वाहतुकीच्या नियमांबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी माणगाव वाहतूक शाखेचे वाहतूक पोलीस देवकूळे, लालासाहेब वाघमोडे, बांडे, शेरकर आदि उपस्थित होते.

या कार्यक्रमाला वाहनचालक तसेच अन्य मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# जोहेचा राजाच्या महाआरतीला दादर सागरी पोलिसांची उपस्थिती

**पेण : प्रतिनिधी**

संपूर्ण देशात गणपती बाप्पाच्या मूर्तींचे माहेरघर म्हणून ओळख असलेल्या पेण तालुक्यातील गणेशमूर्तीचे हब जोहे गावात साखरचौथ निमित्त जोहेचा राजाची स्थापना करण्यात आली आहे. कोणत्याही संकटात जनतेच्या सुरक्षेची काळजी घेताना स्वतः च्या जीवाची पर्वा न करणाऱ्या दादर सागरी पोलिसांच्या हस्ते यावेळी बाप्पाची महाआरती उत्साहात झाली.

वर्षभर गणेशमूर्ती बनविण्यात पेण तालुक्यासह जोहे गावातील ज्येष्ठ, महिला व युवावर्ग व्यस्त असतो. मात्र श्रीगणेश चतुर्थी गणेशोत्सव झाल्यानंतर पहिल्या संकष्टी चतुर्थीला विशेषतः पेण, पनवेल, उरण आदी तालुक्यात घरगुती व सार्वजनिक स्वरूपात मोठ्या प्रमाणात साखरचौथ



गणपती सण साजरा केला जातो. यावेळी उपपोलीस निरीक्षक के. आर. भऊड, रवी मुंडे व पोलीस कर्मचारी यांच्या हस्ते व शेकडो भक्तांच्या उपस्थितीत बाप्पाची महाआरती करण्यात आली.

प्रतिष्ठानकडून गायक संतोष पाटील यांच्या संगीत भजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी भाजप तालुका अध्यक्ष श्रीकांत पाटील, महाराष्ट्र राज्य गणेश मूर्तिकार संघटनेचे अध्यक्ष अभय म्हात्रे माजी सरपंच काशिनाथ पाटील, गोपीनाथ मोकल, साज मराठी निर्माते सुनिल पाटील, जोहेचा राजा प्रतिष्ठानचे संस्थापक देवा पेरवी, अध्यक्ष नारायण म्हात्रे, वैभव धुमाळ, उपाध्यक्ष रवींद्र रसाळ, कार्याध्यक्ष विनोद म्हात्रे, दीपेश पाटील, रुपेश पाटील, कमलाकर बोरकर आदी उपस्थित होते.

# खोपोली भाजप महिला मोर्चाकडून अंगणवाडी दत्तक

**खोपोली : प्रतिनिधी**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवडा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निमित्ताने शहराच्या विविध भागात सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. या पार्श्वभूमीवर भाजप खोपोली महिला मोर्च्या अध्यक्ष शोभाताई काटे यांच्या प्रकाश नगर येथील घराजवळील अंगणवाडी शाळा क्रमांक ११ ही दोन महिन्यांकरिता दत्तक घेण्यात आली तसेच शाळेच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, शाळेत ज्या ज्या समस्या आहेत, त्या समस्या पाहिल्या जातील त्याचप्रमाणे सकस आहार विद्यार्थ्यांना देण्यात येणार असल्याचे या वेळी सांगण्यात आले.

या कार्यक्रमाला भाजप उत्तर रायगड जिल्हा महिला मोर्च्या अध्यक्षा अश्विनी पाटील तसेच खोपोली महिला आघाडी उत्तर रायगड जिल्हा कोषाध्यक्ष रसिका शेट्ये, अनिता शाह खोपोली माजी नगरसेविका, अपर्णा मोरे खोपोली शहर सरचिटणीस, अश्विनी अत्रे उपाध्यक्षा, अपर्णा साठे खजिनदार, विमल गुप्ते तसेच चिटणीस गीता मोहिते आणि




सुनीता पाटणकर सुमिता महर्षी, स्नेहल सावंत आणि खोपोली शहर अध्यक्ष इंद्रमल खंडेलवाल सरचिटणीस हेमंत नांदे, प्रमोद पिंगळे, डॉ.नागरगोजे, विकास खुरपुडे, गोपाळ बावसकर, राकेश दाबके, अजय इंगुलकर, सुनील नांदे, संजय म्हात्रे, सागर काटे इत्यादी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या प्रसंगी महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील म्हणाल्या, भाजपच्या कार्यकर्त्यांनी तळागाळात जाऊन सरकारच्या ज्या योजना आहेत त्या समजावून सांगणे, त्याचप्रमाणे पक्ष संघटना वाढीसाठी प्रयत्न करावेत असे आवाहन केले.

# कोविडमुळे मोहम्मद शमी संघाबाहेर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मोहाली येथे भारत विरुद्ध ऑस्ट्रेलियाची तीन सामन्यांची टी-२० मालिका २० सप्टेंबरला सुरू होणार आहे. ही मालिका सुरू होण्यापूर्वी भारतीय संघातून एक महत्त्वाचा खेळाडू बाहेर झाला आहे. भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी याला कोरोना विषाणूचा संसर्ग झाल्याने तो ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-२० मालिकेत खेळू शकणार नाही. मागील अनेक दिवसांपासून तो संघाबाहेर होता, पण आता कोरोना संसर्ग झाल्याने त्याचे पुनरागमन पुन्हा एकदा लांबणीवर पडले आहे.

याबाबतची अधिक माहिती देताना भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) एका वरिष्ठ सूत्राने पीटीआय वृत्तसंस्थेला सांगितले की, मोहम्मद शमीची कोविड-१९ चाचणी पॉझिटिव्ह आली आहे. कोरोना संसर्गाची लक्षणे सौम्य असल्याने काळजी करण्यासारखे काही नाही, मात्र कोरोना संसर्गामुळे त्याला विलगीकरणात राहावे लागणार आहे. त्याची कोरोना चाचणी निगेटिव्ह आल्यावर तो पुन्हा संघात पुनरागमन करू शकेल.



मोहम्मद शमी दक्षिण आफ्रिकेविरुद्धची टी-२० मालिका सुरू होण्यापूर्वी संघात परतण्याची शक्यता आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धचे तीन टी-२० सामने अनुक्रमे २०, २३ आणि २५ सप्टेंबर रोजी होणार आहेत. त्यानंतर २८ सप्टेंबरपासून भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यात तीन टी-२० सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे.

## टी-२० मालिकेआधी भारताला धक्का

### उमेश यादवला संधी

मोहम्मद शमीच्या जागी आता भारताचा अनुभवी वेगवान गोलदांज उमेश यादवला संघात संधी मिळणार आहे. तोही दोन वर्षांनंतर संघात पुनरागमन करणार आहे. यापूर्वी २०१९मध्ये उमेश ऑस्ट्रेलियाविरुद्ध सात टी-२० सामन्यांच्या मालिकेत खेळला होता. दरम्यान, त्याला दुखापत झाल्याने मागील दोन वर्षांपासून तो संघाबाहेर होता. अखेर तो पुनरागमन करणार आहे.

## नवदीप सैनी वनडे मालिकेतून 'आऊट'

**नवी दिल्ली** : भारतीय क्रिकेटपटू नवदीप सैनी दुखापतीमुळे भारत अ संघातून बाहेर पडला आहे. सैनी न्यूझीलंड अ संघाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत खेळणार होता, मात्र दुलीप ट्रॉफीच्या दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात नवदीपला दुखापत झाली आहे. या स्पर्धेत तो उत्तर विभाग संघाचा एक भाग आहे. नवदीपच्या जागी ऋषी धवनचा भारत अ संघात समावेश करण्यात आला आहे.

न्यूझीलंड अ संघाविरुद्ध होणारी ही वनडे मालिका चेन्नईमध्ये खेळली जाणार आहे.



# उरणमध्ये येत्या गुरुवारी जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धा

**उरण : बातमीदार**

रायगड जिल्हा परिषदेचे सदस्य विजय भोईर व उद्योजक विकास भोईर या दोघा जुळ्या भावांचे वाढदिवसाचे औचित्य साधून दरवर्षी विविध उपक्रम राबविले जातात. त्यानुसार याही वर्षी २२ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत उरण शहरातील विमला तलाव येथे विजय विकास सामाजिक संस्था नवघरच्या माध्यमातून रायगड जिल्हास्तरीय फ्रि स्टाईल जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धेचे उद्‌घाटन उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या हस्ते होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

जलतरण स्पर्धा राष्ट्रीय सुवर्णपदक विजेते प्रशिक्षक हितेश भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली होणार असून जास्तीत जास्त स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन विजय विकास सामाजिक संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत बजरंग पुनिया पराभूत

**बेलाग्रेड : वृत्तसंस्था**

टोकियो ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक पटकाविणाऱ्या भारताच्या बजरंग पुनिया याला जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेमध्ये निराशेचा सामना करावा लागला. उपांत्यपूर्व फेरीत त्याला पुरुष विभागाच्या ६५ किलो वजनी गटाच्या लढतीत अमेरिकेच्या यिआन्नी डायकोमिहालीस याच्याकडून पराभव पत्करावा लागला. त्यामुळे सुवर्णपदक जिंकण्याच्या शर्यतीमधून त्याला बाहेर व्हावे लागले.

बजरंग याने याआधी जागतिक स्पर्धेत २०१३मध्ये कांस्यपदक, २०१८मध्ये रौप्यपदक आणि २०१९मध्ये कांस्यपदक जिंकले होते. त्यानंतर टोकियो ऑलिम्पिक कांस्यपदकाला गवसणी घालत बजरंगने आपला आलेख आणखी उंचावला होता. त्यामुळे बेलग्रेड येथे सुरू असलेल्या जागतिक स्पर्धेमध्ये त्याच्याकडून सुवर्णपदक जिंकण्याच्या आशा



बाळगल्या जात होत्या.

बजरंग याने उपउपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत क्युबाचा कुस्तीपटू लेक्झँड्रो तोबीएर याच्यावर ५-४ असा विजय साकारत आगेकूच केली होती, मात्र त्यानंतरच्या लढतीत बजरंगला प्रतिमेला साजेशी कामगिरी करता आली नाही. २३ वर्षीय यिआन्नी डायकोमिहालीस याने बजरंगवर तांत्रिक बाबींमध्ये (१०-०) विजय मिळवला.

## टीम डेव्हिड ऑस्ट्रेलियाकडून भारताविरुद्ध करणार पदार्पण

**मोहाली : वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेला २० सप्टेंबरपासून सुरुवात होत आहे. यासाठी ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघाने सरावही सुरू केला आहे. दरम्यान, सिंगापूर आंतरराष्ट्रीय संघाकडून खेळलेला टीम डेव्हिड आता ऑस्ट्रेलियाकडून भारताविरुद्ध पदार्पण करण्यासाठी सज्ज आहे. त्याने यंदाच्या आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सकडून दमदार कामगिरी केली आहे.

आपल्या स्फोटक फलंदाजीसाठी ओळखला जाणारा टीम डेव्हिडची टी-२०मधील सरासरी ४६.५० इतकी आहे. त्याच वेळी त्याचा स्ट्राईक रेट १५८ इतका राहिला आहे. यंदा आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सने डेव्हिडला नियमित संधी दिली आणि त्याने जबरदस्त फटकेबाजी केली. या हंगामात खेळल्या गेलेल्या आठ सामन्यांमध्ये डेव्हिडने २१६.२७च्या स्ट्राइक रेटने १८६ धावा केल्या. यात १६ षटकार आणि १२ चौकारांचा समावेश होता. त्यामुळे आता ऑस्ट्रेलियाकडूनही तो कशी कामगिरी करतो याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

# मुश्ताक अली स्पर्धेपासून प्रभावी खेळाडूचा नवा नियम

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) देशांतर्गत क्रिकेट हंगामातील सय्यद मुश्ताक अली ट्वेन्टी-२० क्रिकेट स्पर्धेसाठी प्रभावी खेळाडू (इम्पॅक्ट प्लेअर) हा नवा नियम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. ही स्पर्धा ११ ऑक्टोबरपासून सुरू होणार असून बीसीसीआयने सर्व राज्य संघटनांना ई-मेलद्वारे या नियमाच्या अंमलबजावणीबाबत कळविले आहे.

बीसीसीआय गेल्या काही वर्षांपासून इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये हा नियम आणण्याचा प्रयत्न करीत होते, मात्र त्यापूर्वी त्यांनी या नियमाचा पहिला प्रयोग सय्यद मुश्ताक अली स्पर्धेत करून पाहण्याचे ठरवले आहे. ही संकल्पना या स्पर्धेत यशस्वी ठरल्यास आयपीएलमध्ये २०२३पासून या नियमाचा समावेश करण्यात येईल, असे बीसीसीआयने म्हटले आहे. या नियमाने ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये अधिक आकर्षकता येईल, असे बीसीसीआयने म्हटले आहे.

ऑस्ट्रेलियामधील प्रसिद्ध बिग बॅश स्पर्धेतदेखील असाच नियम लागू आहे. दोन्ही संघांना पहिल्या डावाच्या दहाव्या षटकाआधी १२वा किंवा १३वा खेळाडू वापरण्याची संधी असते, मात्र बीसीसीआयच्या नियमानुसार १४व्या षटकाआधी 'इम्पॅक्ट प्लेयर' सामन्यामध्ये वापरता येणार आहे

नाणेफेकीदरम्यान प्रतिस्पर्धी संघ चार राखीव खेळाडूंची नावे देतील. दोन्ही डावांतील १४व्या षटकापूर्वी एखाद्या खेळाडूला बदलून चारपैकी एका प्रभावी खेळाडूला संधी मिळेल. एखादा फलंदाज बाद झाला असला तरी त्याच्या जागी प्रभावी खेळाडूचा समावेश होऊ शकेल. त्याला फलंदाजी करता येईल. एखाद्या गोलंदाजाची काही षटके संपल्यानंतरही बदली गोलंदाज म्हणून प्रभावी खेळाडू चार षटके टाकू शकेल.

# शुभमन गिल गुजरात टायटन्स संघ सोडणार?



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

गुजरात टायटन्सने यंदाच्या पदार्पणाच्या हंगामातच विजेतेपदाला गवसणी घातली होती. भारताचा युवा सलामीवीर शुभमन गिल या नव्या संघाचा एक अविभाज्य भाग होता. त्याने अंतिम सामन्यातदेखील महत्त्वपूर्ण खेळी केली होती, मात्र सध्या गुजरात टायटन्स आणि शुभमन गिल यांच्यात झालेल्या ट्विटवरील संवादावरून गिल गुजरात टायटन्स सोडणार का अशी शंका निर्माण झाली आहे.

गुजरात टायटन्सने ट्विटर अकाऊंटवरून 'हा प्रवास कायम लक्षात राहील. शुभमन गिल तुला पुढच्या प्रयत्नांसाठी शुभेच्छा,' असे ट्वीट केले. याला गिलनेही हृदयाचा व मिठी मारल्याचा इमोजी शेअर करीत प्रतिक्रिया दिली.

या संपूर्ण घडामोडींवर एका नेटकऱ्याने हे काय चालले आहे अशी प्रतिक्रिया दिली, तर दुसऱ्या एका युजरने, 'उथप्पाने सीएसकेमधून निवृत्ती घेतली आहे. त्यामुळे तिथे एक पोकळी निर्माण झाली आहे तसेच गुजरात टायटन्स रवींद्र जडेजाची आयपीएल २०२३ची होम फ्रेंचायजी असू शकते. आपण मोठ्या बदलांकडे चाललो आहोत का?,' असा प्रश्न विचारला.

काही नेटकरी हा एक सोशल मीडिया प्रँक असल्याचे बोलत आहेत, तर दुसऱ्या एका नेटकऱ्याने ही जाहिरात असल्याचे म्हटले आहे.

# अश्विन ऑस्ट्रेलियात ठरू शकतो एक्स फॅक्टर

## न्यूझीलंडचा माजी कर्णधार व्हिटोरीचे मत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

रविचंद्रन अश्विनची त्वरित जुळवून घेण्याची क्षमता आणि ऑस्ट्रेलियाच्या परिस्थितीबद्दल जाणून घेणे त्याला टी-२० विश्वचषक स्पर्धेत मदत करू शकते, असे मत न्यूझीलंडचा माजी फिरकीपटू डॅनियल व्हिटोरी याने व्यक्त केले आहे.

वेगवान आणि उसळत्या खेळपट्ट्यांचा विचार केला तर फिरकी गोलंदाज तेवढे प्रभावी नसतात. अशा परिस्थितीत भारताने ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या टी-२० विश्वचषकासाठी अश्विन, युझवेंद्र चहल आणि अक्षर पटेल या फिरकीपटूंची निवड केली आहे.



लिजेंड्स क्रिकेट लीग खेळण्यासाठी भारतात आलेला न्यूझीलंडचा माजी कर्णधार व्हिटोरी म्हणाला की, अश्विन कसोटीत यशस्वी अनुभवी फिरकीपटू आहे हे आणि आपल्या सर्वांना माहीत आहे. तो अशा लोकांपैकी एक आहे ज्यांना समजते की त्याला एखाद्या परिस्थितीत काय करायचे आहे. मला वाटते की जर तो अंतिम ११मध्ये निवडला गेला आहे, तर त्याला त्या परिस्थितीत कशी कामगिरी करायची हे समजेल. त्याने अनेकवेळा ऑस्ट्रेलियाचा दौरा केला आहे.

व्हिटोरी पुढे असेही म्हणाला की, रवींद्र जडेजाच्या दुखापतीमुळे अश्विन आगामी टी-२० विश्वचषकात अष्टपैलू फिरकी गोलंदाजी खेळाडूची जागा घेऊ शकतो तसेच तो पुढे म्हणाला की, भारताकडे फिरकी गोलंदाज भरपूर आहेत. चांगली गोष्ट अशी आहे की बहुतेक फिरकीपटू अष्टपैलू आहेत आणि त्याच वेळी मला वाटते की, ते अश्विनला इतरांपेक्षा वेगळे करते आणि संघाला चांगले संतुलन देते.

भारतीय क्रिकेटमधील फिरकीपटूंच्या भवितव्याबाबत बोलताना त्याने म्हटले की, जेव्हा संघात अश्विन आणि जडेजासारखे मोठे गोलंदाज आहेत जे कसोटीत यशस्वी आहेत आणि क्रिकेटच्या तिन्ही प्रकारात त्यांची खेळण्याची क्षमता आहे तेव्हा नवख्या फिरकीपटूंना त्यांच्याकडून शिकण्यासारखे आहे.

# शेन बाँड आता मुंबई इंडियन्स एमिरेट्स संघाचा मुख्य प्रशिक्षक



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्स फ्रेंचायजीने मुंबई इंडियन्स एमिरेट्स संघाचा मुख्य प्रशिक्षक म्हणून शेन बाँडची नियुक्ती केली. बाँड हा सध्या मुंबई इंडियन्सचा गोलंदाजी प्रशिक्षक आहे. आता तो मुंबई इंडियन्स एमिरेट प्रमुख कोच असणार आहे.

मुंबई इंडियन्स फ्रेंचायजीने एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही माहिती दिली. मुंबई एमिरेट्सचा फलंदाजी कोच म्हणून पार्थिव पटेल आणि विनय कुमारला गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून नियुक्त केले, तर रॉबिन सिंगला एमआय एमिरेट्सचा जनरल मॅनेजर करण्यात आले आहे.

शेन बाँड हा मुंबई इंडियन्सशी २०१५मध्ये जोडला गेला आहे. तेव्हापासून मुंबई इंडियन्सने चार आयपीएल विजेतेपदे पटकाविली आहेत, तर रॉबिन सिंग २०१०पासून मुंबई इंडियन्स परिवाराशी जोडला गेला आहे. त्याच्या कारकिर्दित मुंबई इंडियन्सने पाच आयपीएल किताब जिंकले आहेत.

शेन बाँडने नव्या नियुक्तीनंतर मुंबई इंडियन्सचे आभार मानले. मुंबई इंडियन्सच्या विजयाची परंपरा पुढे नेण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्याने म्हटले आहे. यापूर्वी मुंबई इंडियन्सने दक्षिण आफ्रिकेचा माजी क्रिकेटपटू मार्क बाऊचरला मुंबई इंडियन्सचा मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

# रक्तदान सर्वश्रेष्ठ दान!



कामोठे



खारघर

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com